cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-४४ | शनिवार, दि.७ जुन २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### जेतेपदाला गालबोट

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघाने पंजाब किंग्ज संघाला पराभूत करून १८ वर्षांनंतर पहिल्यांदा आयपीएल चषकावर आपले नाव कोरले. या विजयानंतर बुधवारी बंगळुरूत आरसीबी संघाच्या विजयोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. विजय रॅलीही काढण्यात येणार होती. संघ विमानतळावर दाखल झाला तेव्हा इतकी प्रचंड गर्दी झाली की ती पाहून नंतर काढण्यात येणाऱ्या विजय रॅलीला परवानगी नाकारली. रस्त्यावर जमा होणाऱ्या गर्दीमुळे संभाव्य रहदारी समस्या लक्षात घेऊन विजयी मिरवणुकीला परवानगी नाकारण्यात आली.

### माऊलींचा पालखी सोहळा यंदा उशिरा सुरु होणार

आळंदी-संत ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थना सोहळ्याची वेळ यावर्षी पुढे ढकलण्यात आली आहे. कारण प्रस्थान सोहळ्यादिवशीच गुरुवार आला आहे. रोजच्या नीतिनियमानुसार दर गुरुवारी माऊलीची पालखी निघते, त्याला गुरुवार सोहळा म्हणतात, म्हणजेच १९ जून गुरुवार या दिवशी आधी नितीनियमानुसारची पालखी निघणार. त्यानंतर आरती होणार आणि मग पालखी प्रस्थान सोहळा सुरू होणार. म्हणजेच दरवर्षी दुपारी ४ वाजता सुरू होणारा प्रस्थान सोहळा रात्री ८ पर्यंत सुरू होणार.

## थोडक्यात...

### मुक्ताईच्या पालखीचे आषाढी वारीनिमित्त प्रस्थान

मुक्ताईनगर-आदिशक्ती मुक्ताईची पालखीचे आषाढी वारीनिमित्त प्रस्थान झाले आहे. मुक्ताई मंदिरात मुक्ताईच्या पादुकांचा अभिषेक, विविध धार्मिक कार्यक्रम मंदिरात पार पडला. यावेळी मान्यवरांची उपस्थिती होती.

### अभिनेता डिनो मोरियाच्या घरावर ईडीची छापेमारी

मुंबई-मिठी नदीचा गाळ काढण्याच्या प्रकल्पातील कथित अनियमितता आणि निधीच्या कथित गैरवापर प्रकरणात ईडीने अभिनेता डिनो मोरियाच्या मुंबईतील घरावर छापे टाकले आहेत. सकाळी ८ वाजल्यापासून डिनोच्या घरावर ईडीकडून छापेमारी सुरू होती.

### वाहन कर्ज, गृहकर्ज स्वस्त होणार

मुंबई-आरबीआयने ग्राहकांना मोठे गिफ्ट दिले आहे. रेपो दरात मोठी कपात केली आहे. त्यामुळे रेपो रेट आता ५.५ टक्क्यांवर आला आहे. त्यामुळे गृहकर्ज, वाहन कर्ज आणि इतर कर्जावरील व्याजदरात पुन्हा मोठी कपात होणार आहे.

### सामाजिक न्याय विभागाला पुन्हा फटका

मुंबई-'लाडकी बहीण'साठी सामाजिक न्याय विभागाला पुन्हा फटका बसला आहे. या खात्याचा ४१० कोटींचा निधी वळवल्याचे समोर आले आहे. लाडक्या बहिणींसाठी राज्य सरकारची पैशांची जमवा-जमव करताना दमछाक होताना दिसत आहे.

### तुळजाभवानी मंदिरात शिवराज्याभिषेक सोहळा

धाराशिव-तुळजाभवानी मंदिरात मराठा क्रांती ठोक मोर्चाकडून शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करण्यात आला. तुळजाभवानी छत्रपती शिवाजी महाराजांचे दैवत असल्याने या पूजेला महत्त्व आहे. त्यामुळे देवीच्या गाभाऱ्यात शिवराज्याभिषेक केल्याचे मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने सांगण्यात आले.

### सांडपाण्यात कोरोना विषाणूचा अंश

पुणे-शहरातील सांडपाण्यात कोरोना विषाणूचा अंश आढळून आल्याने चिंता वाढली आहे. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचा तपासणीतील हा निष्कर्ष असून मे पासून संसर्गात वाढ झाली आहे. शहरातील १० सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातील पाण्याची तपासणी करण्यात येते. दर आठवड्याला ४० ते ६० नमुन्यांची तपासणी होते. या सर्व तपासणीत कोरोना विषाणूचा अंश आढळून आला आहे.

### उध्दव ठाकरेंनी एक फोन करावा- संदीप देशपांडे

मुंबई-युतीबाबत अद्याप उद्धव ठाकरेंकडून कोणताही प्रस्ताव आला नाही. उद्धव ठाकरेंनी एक फोन करावा अशी अपेक्षा आहे. त्यांनी एक पाऊल टाकलं तर आम्ही शंभर पावलं पुढे येऊ अशी प्रतिक्रीया संदीप देशपांडे आणि अविनाश जाधव यांनी दिली. ठाकरे बंधुंच्या मनोमिलनाबाबत सकारात्मक आहोत मात्र आता ताकही फुंकून पिणार असल्याचे ते यावेळी म्हणाले.

### भारतात १० कोटींहून अधिक सायबर हल्ले

मुंबई : पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतावर १० कोटींहून अधिक सायबर हल्ले झाल्याची माहिती पंतप्रधानांना एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली आहे. हे हल्ले प्रामुख्याने सरकारी वेबसाइट्स, बँकिंग सिस्टम्स आणि महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवर लक्ष्यित होते. सायबर सुरक्षा यंत्रणांनी यापैकी बहुतांश हल्ले यशस्वीपणे परतवून लावले आहेत.

# राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढणार

## अतिवृष्टी होणार, नदी नाले वाहणार; पंजाबराव डखांचा हवामान अंदाज

**परभणी । प्रतिनिधी**

**हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, दि. ४ जूनपासून पाऊस पुन्हा सक्रिय झाला आहे. सध्या काही भागात पाऊस पडत आहे, तर काही भागात पावसाने उघडीप दिली आहे. हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांच्या हवामान अंदाजानुसार राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढणार असून काही भागात अतिवृष्टी होणाार आहे. तर मुसळधार पावसामुळे नदी-नाले वाहणार असल्याचे डख यांनी म्हटले आहे.**

गेल्या काही दिवसात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आहे. नदी नाले दुथडी भरुन वाहत आहेत. धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ होत आहे. दरम्यान, अशातच राज्यातील २६ जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आल्याची माहिती हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी दिली आहे. वादळी वारे, विजा आणि मध्यम पर्जन्याची शक्यता पान २ वर



### ७ ते १० जूनच्या दरम्यान भाग बदलत पाऊस पडणार

पंजाबराव डख यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यात ७ ते १० जूनच्या दरम्यान भाग बदलत पाऊस पडणार आहे. शेतकऱ्यांचे १० जून पर्यंत शेत नाही तयार झाले तर १०, ११ आणि १२ जून तीन दिवस शेत तयार करायला पुन्हा चान्स मिळेल. राज्यात १३ ते १८ जून मुसळधार पाऊस पडणार आहे. ठिकठिकाणी वढे नाले वाहतील असा पाऊस पडणार आहे.

### १३ जून ते १८ जूनच्या दरम्यान मुसळधार

पूर्व विदर्भ, पश्चिमी विदर्भ, दक्षिण महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, कोकणपट्टी, खान्देश, मराठवाडा सगळ्या विभागामध्ये ७, ८, ९ जून दरम्यान भाग बदलत पाऊस पडणार आहे. पण त्याच्यानंतर १३ जून ते १८ जूनच्या दरम्यान खूप मुसळधार पाऊस पडणार, तर काही ठिकाणी अतिवृष्टी देखील होईल. म्हणजे ओढे- नाले वाहतील असा पाऊस पडणार आहे.

### गोंदिया, भंडारा, नंदुरबार, लातूर - कोरडे हवामान राहणार आहे.

गेल्या काही दिवसापासून राज्याच्या विविध भागात जोरदार पाऊस कोसळताना दिसत आहे. काही भागात अतिवृष्टी देखील झाली आहे. नदी नाले दुधतडी भरुन वाहत आहेत. धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. तसेच काही भागात जास्त पाऊस पडल्यामुळे शेती पिकांचे देखील नुकसान झाले आहे. अशातच पुन्हा राज्यात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आली आहे.

# दिवाळीपूर्वी घरकुलांचे टार्गेट पूर्ण कराच अन्यथा निधी नाही

## ना. पंकजाताई मुंडे यांचे प्रशासनाला स्पष्ट निर्देश

**परळी वै । प्रतिनिधी**

**प्रत्येकाच्या डोक्यावर हक्काचे छत असणे ही खूप मोठी गोष्ट आहे दारिद्र्य ही सर्वात मोठी पीडा असून दारिद्र्याची व गरिबीची जाण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना असल्याने त्यांनी अतिशय कार्यबद्ध पद्धतीने संपूर्ण देशभरात प्रत्येकाला हक्काचे घर देण्यासाठी घरकुल योजना सुरू केलेल्या आहेत परळी अंबाजोगाई तालुक्यात घरकुलांचे उर्वरित टार्गेट पूर्ण करा व दिवाळीपूर्वी प्रत्येकाच्या हातात घरकुलाची चावी द्या या दृष्टीने काम करा असे निर्देश राज्याच्या**



**पर्यावरण तथा पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज इथे दिले.**

शहरातील नटराज रंगमंदिरात परळी व अंबाजोगाई पंचायत समिती, ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या वतीने "दिवाळी नवीन घरकुलात उपक्रम कार्यशाळा" आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी त्या बोलत होत्या. आ.धनंजय मुंडे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, उपविभागीय अधिकारी अरविंद लाठकर, गटविकास अधिकारी संजय केंद्रे, समृद्धी दिवाणे आदी यावेळी उपस्थित होते.या कार्यशाळेत घरकुल योजनांच्या अंमलबजावणीसाठी विविध पातळ्यांवरील अडचणींवर चर्चा करण्यात आली. जिल्हा प्रशासनाला उद्देशून स्पष्ट संदेश देताना ना. पंकजाताई मुंडे यांनी अधिकाऱ्यांना सजगतेने आणि संवेदनशीलतेने काम करण्याचे निर्देश दिले. पान २ वर

## जालिंदर सुपेकरांना अजित पवारांनीच पाठीशी घातले

### आरटीआय कार्यकर्ते विजय कुंभार यांचा गंभीर आरोप





**पुणे । प्रतिनिधी**

**वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात वरिष्ठ पोलिस अधिकारी जालिंदर सुपेकर यांचे नाव येऊन सुध्दा त्यांच्यावर कारवाई केली जात नसल्याचे बोलले जात आहे. त्यातच आरटीआय कार्यकर्ते विजय कुंभार यांनी उपमुख्यमंत्री आणि बीडचे पालकमंत्री अजित पवार यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. सुपेकरांना अजित पवारांनीच पाठीशी घातले असल्याचे म्हटले आहे.**

वैष्णवी हगवणे प्रकरणानंतर हगवणे यांचे नातेवाईक असलेले वरिष्ठ पोलिस पान २ वर

### सुपेकरांची योग्य ती चौकशी केली जाईल-योगेश कदम



हगवणे प्रकरणानंतर वरिष्ठ पोलिस अधिकारी जालिंदर सुपेकर यांच्यावर आरोप झाल्यावर त्यांची बदली करण्यात आली. या प्रकरणाची चौकशी केली जाणार असून दोषी असल्यावर कारवाई केली जाणार आहे. तसेच कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही, असे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी म्हटले आहे.

## बीडमध्ये उभारणार सहकार संकुल; १४ कोटी ९८ लाखांची प्रशासकीय मान्यता

### युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मानले उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आभार

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरातील नगर भूमापन क्र.१७९९ या मालकीच्या जागेवर 'सहकार संकुल' इमारतीच्या बांधकामासाठी सुमारे १४ कोटी ९८ लाख रुपये इतक्या खर्चाच्या प्रस्तावास शासनाकडून बुधवारी (दि.४) प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.**



जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालय व इतर सहकारी संस्थांच्या क्षेत्रीय कार्यालयांना आता एकाच छताखाली आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. बीडमध्ये सध्या जिल्हा उपनिबंधक कार्यालय हे जालना रोडवरील सहकार शक्ती इमारतीत भाडेतत्त्वावर कार्यरत आहे. यासाठी मोठा शासकीय निधी वार्षिक भाड्यापोटी खर्ची पडतो. हा अनावश्यक खर्च टाळण्यासाठी आणि कार्यप्रणाली अधिक सुसुत्र करण्यासाठी सर्व सहकारी कार्यालये एकत्रित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नव्या सहकार संकुलामुळे शासकीय पान २ वर

## महाराष्ट्राच्या मनात जे तेच होईल

### राज ठाकरेंसोबत जाण्याचे उध्दव ठाकरेंचे स्पष्ट संकेत





**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येणार अशा पद्धतीची चर्चा जोर धरू लागली आहे. त्यातच, आधी शिवसेना खासदार संजय राऊत यांनी, तर उद्धव ठाकरे यांनी देखील युतीचे स्पष्ट संकेत दिले आहेत. जे महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात आहे, तेच होईल, असे उध्दव ठाकरे यांनी स्पष्टपणे सांगितले.**

त्यानंतर मुंबईसह कोल्हापुरातील शिवसैनिक आणि मनसैनिक यांना अत्यंत आनंद झाला आहे. हे दोन्ही बंधू एकत्र येणे ही महाराष्ट्राची गरज आहे. महाराष्ट्रातील बाळासाहेबांच्या सैनिकांची इच्छा आहे हे दोन्ही बंधू एकत्र यावेत. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आल्यास इतर पक्षांची चांगलीच अडचण होऊ शकते. पान २ वर

### एका वाक्यात फडणवीसांनी विषय संपवला



पत्रकारांनी मुख्यमंत्र्यांना ठाकरे बंधुंच्या मनोमिलनावर प्रश्न विचारला असता ते म्हणाले, जेव्हा याबाबत ठोस होईल त्यावेळी प्रतिक्रिया देईन, असे सांगितले. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही हात जोडत, आम्ही महायुती म्हणून निवडणूक लढू आणि जिंकू असे म्हटले.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.६ जुन २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३७.०० क्विंटल | २,२०० | २,६६१ | २,४७७ |
| ज्वारी/हायब्रिड: १८२.५० क्विंटल | १,९०१ | २,८०१ | २,३८१ |
| मका/लोकल:२४.५०क्विंटल | २,०७५ | २,१९५ | २,१३५ |
| तूर : २०.५० क्विंटल | ६,४२१ | ६,४५० | ६,४४० |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ७५.०० क्विंटल | २,००० | २,७०१ | २,३४० |
| मुग :१.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| सोयाबीन:५.५० क्विंटल | ४,१०० | ४,१०० | ४,१०० |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,३४६ | ५,३४६ | ५,३४६ |

# एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा तिढा कायम

## थकलेले पूर्ण वेतन देण्यासाठी निधीच नाही

**मुंबई । प्रतिनिधी**

**एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी दर महिन्याला सरकारकडून निधी उपलब्ध करून दिला जातो. पण गेले अनेक महिने मागणी प्रमाणे आवश्यक निधी येत नसल्याने कर्मचाऱ्यांना अर्धे वेतन देण्यात येत असून या महिन्यात पुन्हा पूर्ण वेतन देण्याइतका निधी सरकार कडून आलेला नाही. त्या मुळे त्यामुळे केवळ नक्त वेतन मिळणार आहे.**

महामंडळाची आर्थिक स्थिती एकदम बिकट असल्याने एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी सरकारकडून दर महिन्याला सवलत मूल्य प्रतिपूर्ती रक्कम देण्यात येत आहे. ती कधीच पूर्ण येत नसल्याने पूर्ण वेतन देण्यात अडचणी वेतन निर्माण होत असून पी.एफ., ग्र्याजुटी, बँक कर्ज, एल.आय. सी., अशी ही साधारण ३५०० कोटी रुपयांची देणी कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात होऊन सुद्धा त्या त्या संस्थांकडे वर्ग करण्यात आलेली नाहीत. कर्मचाऱ्यांची व महामंडळाची एकूण थकीत देणी रक्कम ही सात हजार कोटी रुपयांच्यावर गेली असून संचित तोटा दहा हजार कोटी पान २ वर

### वेतनासाठी हवे ४६० कोटी

८७ हजार कर्मचाऱ्यांना नक्त वेतन देण्यासाठी ३७७ कोटी रुपये इतकी रक्कम लागते तर पूर्ण वेतन देण्यासाठी ४६० कोटी रुपये इतकी रक्कम लागते. पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने या महिन्यातही नक्त वेतन देण्याची नामुष्की व्यवस्थापनावर ओढवली आहे.



cmyk

## अग्रलेख

# जेतेपदाला गालबोट

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघाने पंजाब किंग्ज संघाला पराभूत करून १८ वर्षांनंतर पहिल्यांदा आयपीएल चषकावर आपले नाव कोरले. या विजयानंतर बुधवारी बंगळुरूत आरसीबी संघाच्या विजयोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. विजय रॅलीही काढण्यात येणार होती. संघ विमानतळावर दाखल झाला तेव्हा इतकी प्रचंड गर्दी झाली की ती पाहून नंतर काढण्यात येणा-या विजय रॅलीला परवानगी नाकारली. रस्त्यावर जमा होणा-या गर्दीमुळे संभाव्य रहदारी समस्या लक्षात घेऊन विजयी मिरवणुकीला परवानगी नाकारण्यात आली. त्यामुळे कर्नाटक क्रिकेट संघटनेने एम. चिन्नास्वामी स्टेडियममध्ये आरसीबी संघाच्या सत्कार समारंभाचे आयोजन केले होते. त्याआधी विधान सौधात संघाचा सत्कार करण्यात आला. त्यावेळीही विधान सौधाबाहेर प्रचंड गर्दी जमली होती. तिकडे स्टेडियमही तुडुंब भरले होते. स्टेडियमची प्रेक्षक क्षमता ३२ ते ३५ हजार आहे आणि बाहेर दोन लाख चाहते स्टेडियममध्ये प्रवेश करण्याच्या तयारीत.

स्टेडियमचे बंद गेट उघडण्यासाठी लोकांची रेटारेटी सुरू, त्यांना पांगवण्यासाठी पोलिसांचा लाठीमार मग लोकांची पळापळ सुरू, त्यात अनेकजण चिरडले गेले, काही जणांचे गुदमरून प्राण गेले. भीषण चेंगराचेंगरीत ११ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. मृतांमध्ये सात पुरुष, तीन महिला आणि एका बालिकेचा समावेश आहे. चेंगराचेंगरीत ३३ जण जखमी झाले असून त्यातील ११ जणांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे मृतांची संख्या आणखी वाढण्याची भीती आहे. दुस-या एका वृत्तानुसार ५० जण जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. विजयी संघाची खुल्या बसमधून मिरवणूक काढली जाणार असल्याचे जाहीर करण्यात आले होते. त्यामुळे बंगळुरूच्या रस्त्यावर हजारोंच्या संख्येने चाहते जमा झाले होते. सायंकाळी साडेचार वाजता राज्य सरकारतर्फे विधान सौध आवारात आरसीबीच्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. सायंकाळी सव्वा पाचच्या सुमारास संघ स्टेडियममध्ये दाखल झाला. कार्यक्रम सुरू होण्याआधीच बाहेर चाहत्यांमध्ये धक्काबुक्की सुरू झाली. त्यामुळे चाहत्यांवर नियंत्रण ठेवणे पोलिसांच्या आवाक्याबाहेर गेले. त्यांनी लाठीमार करून जमावावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. यावेळी गेट क्र. १२ जवळ भीषण चेंगराचेंगरी झाल्याने अनेकजण पायदळी तुडवले गेल्याने गंभीर जखमी झाले.

काही जणांनी जागेवरच प्राण सोडले. जखमींना वैदेही, बौरिंग, लेडी कर्झन, विठ्ठल मल्ल्या आदी रुग्णालयांत दाखल करण्यात आले. ११ जणांवर आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत. चेंगराचेंगरीत १४ वर्षीय दिव्यांश या मुलीचा मृत्यू झाला. नववीत शिकणारी ही मुलगी आई-वडिलांसमवेत स्टेडियममध्ये आली होती. चेंगराचेंगरीत गुदमरून तिचा मृत्यू झाला. दुर्घटनेला ढिसाळ नियोजन कारणीभूत आहे हे उघड आहे. पोलिसांना गर्दीचे नियोजन करता आले नाही. याआधी मुंबईत अनेकवेळा विजयी भारतीय संघाचे स्वागत करण्यात आले. २०२४ मध्ये टी-२० विश्वचषक विजेत्या भारतीय संघाचे भव्य स्वागत करण्यात आले. तेव्हा चाहत्यांचा महासागर लोटला होता. परंतु मुंबई पोलिसांनी केलेल्या कौतुकास्पद नियोजनामुळे कोणतीही अप्रिय घटना घडली नाही. बंगळुरूमध्ये खेळाडूंना पाहण्यासाठी अतिउत्साही चाहते बॅरिकेड्स, संरक्षक भिंत ओलांडून आत शिरत होते. काही जण झाडावर चढून बसले होते, अनेकजण खाली पडून जखमी झाले. चाहत्यांचा चेंगराचेंगरीत मृत्यू झाल्याने विजयोत्सवाच्या आनंदावर विरजण पडले आहे. हजारो चाहते विधान सौध आणि स्टेडियमबाहेर जमा होत होते. दुचाकी, चारचाकी, मेट्रो रेल्वे, बस आणि अन्य वाहनांद्वारे चाहते स्टेडियममध्ये येत होते.

अखेर गर्दीला नियंत्रित करण्यासाठी सायंकाळी साडेचार वाजता मेट्रो रेल्वे बंद करावी लागली. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी मृतांप्रति संवेदना व्यक्त केली असून मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १० लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. तसेच जखमींवर मोफत उपचार केले जाणार आहेत. दुर्घटनेत आता राजकारण शिरले आहे. काँग्रेस सरकारच्या बेजबाबदारपणामुळे चेंगराचेंगरीची दुर्घटना घडली, अनेकांना जीव गमवावे लागले. गर्दी नियंत्रणासाठी कोणतेही उपाय करण्यात आले नव्हते. निष्पाप लोकांचे बळी जात असताना मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार क्रिकेटपटूंसोबत रील शूट करण्यात व्यस्त होते अशी टीका राज्य भाजपने केली आहे. आरसीबीच्या विजयोत्सवावेळी घडलेल्या दुर्घटनेला जबाबदार कोण असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. आरसीबी व्यवस्थापनाने खुल्या बसमधून रोड शो करण्याचा निर्णय घेतला होता. पण रोड शो झाला नाही. सरकारने विधान सौध आवारात खेळाडूंचा सत्कार आयोजित केला होता. पावसामुळे १५ मिनिटांत हा कार्यक्रम पार पडला. परंतु स्टेडियममधील कार्यक्रम आम्ही आयोजित केला नव्हता असे सरकारचे म्हणणे आहे. सरळ सरळ हा जबाबदारी झटकण्याचा प्रकार आहे. चाहत्यांची गर्दी होणार हे स्पष्ट असताना सरकारने केलेली व्यवस्था तोकडी पडली हे उघड आहे. भारतातील क्रिकेटवेड सर्वज्ञात आहे. असे असले तरी चाहत्यांनी सुद्धा आपली सद्सद्विवेकबुद्धी जागृत ठेवायला हवी होती. स्टेडियममध्ये मोफत प्रवेश असल्याने तुफान गर्दी होणार यात शंका नव्हती. त्यामुळे प्रत्यक्ष उपस्थित राहण्यापेक्षा त्यांना दूरदर्शनवरही कार्यक्रम बघता आला असता दुसरे म्हणजे हा काही विजयी भारतीय संघ नव्हता. एका प्रादेशिक संघाचा विजय होता. प्रादेशिक अस्मिता मर्यादेतच राहायला हवी. त्यासाठी प्राणाची बाजी लावण्याची काहीच गरज नव्हती. संघ व्यावसायिक होता, त्यातील खेळाडू व्यावसायिक होते. त्यांनी करोडो रुपये कमावले होते. त्यांच्यासाठी आपले लाख मोलाचे प्राण गमावण्याची काय गरज? दुर्घटनेबद्दल प्रतिक्रिया देताना विराट कोहलीने म्हटले आहे, माझ्याकडे बोलण्यासाठी शब्द नाहीत, मी खूप दु:खी आहे. करोडो रुपयांची संपत्ती जमवलेला कोहली मृतांच्या कुटुंबियांना एक पैसाही देणार नाही. त्यामुळे आपण आपल्या जीवावर किती उदार व्हायचे ते चाहत्यांनीच ठरवायचे. विदेशात फुटबॉल सामन्यात, दंगली, चेंगराचेंगरीच्या घटना नेहमीच घडतात. भारतातही विशेषत: धार्मिक कार्यक्रमात अशा चेंगराचेंगरीच्या घटना घडतात. आनंद साजरा करताना भान ठेवायलाच हवे.

# परतूर मतदारसंघात ७० कोटीची फिटर योजना-आ.लोणीकर

**जालना । प्रतिनिधी**

जालना परतूर विधानसभा मतदारसंघ (जालना, मंठा, नेर, शेवली) मध्ये केंद्र आणि राज्य सरकारच्या महत्वाकांक्षी गाव फिटर योजने चा पहिला टप्पा यशस्वीपणे पूर्णत्वाकडे वाटचाल करत असून, आता दुसऱ्या टप्प्याचा शुभारंभ होत आहे. पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने या योजनेसाठी ७० कोटी रुपयांचा भव्य निधी मंजूर केला आहे, ज्यामुळे मतदारसंघातील प्रत्येक गावात २४ तास अखंडित वीज पुरवठा सुनिश्चित होणार आहे. या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी परतूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. बबनराव लोणीकर यांनी अथक प्रयत्न आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा केला आहे. 'सबका साथ, सबका विकास' या पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेला साकार करणारी ही योजना ग्रामीण भागातील वीजपुरवठ्याच्या समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी एक मैलाचा दगड ठरणार आहे. या योजनेच्या माध्यमातून परतूर विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गावात आधुनिक वीज यंत्रणा उभारली जाणार आहे. यामुळे गावकरी आणि शेतकरी बांधवांना सातत्यपूर्ण आणि दर्जेदार वीजपुरवठा मिळणार आहे, ज्याचा थेट फायदा शेती, उद्योग आणि दैनंदिन जीवनावर होईल. या योजनेअंतर्गत नवीन वीज वाहिन्या आणि ट्रान्सफॉर्मर ३३ केव्हीपासून थेट गावापर्यंत नवीन वीज वाहिन्या उभारल्या जाणार आहेत. प्रत्येक गावाला २ ते ५ ट्रान्सफॉर्मर, तर मोठ्या गावांना १० ते १०० ट्रान्सफॉर्मर बसवले जाणार आहेत. यामुळे वीजपुरवठ्याची क्षमता वाढेल आणि लोडशेडिंगच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघेल. पूर्वी गाव आणि शेतीच्या कनेक्शनसाठी एकच ट्रान्सफॉर्मर वापरला जात होता, ज्यामुळे गावात किंवा शेतीत फॉल्ट आल्यास दोन्ही ठिकाणी वीजपुरवठा खंडित होत असे. आता गाव आणि शेतीसाठी स्वतंत्र



ट्रान्सफॉर्मर बसवले जाणार आहेत, ज्यामुळे गावातील फॉल्टमुळे शेती आणि शेतीतील फॉल्टमुळे गावाचा वीजपुरवठा बंद होणार नाही. ही सुविधा शेतकऱ्यांना सातत्यपूर्ण वीजपुरवठा देईल, ज्यामुळे शेती उत्पादनात वाढ होईल. या योजनेसाठी केंद्र आणि राज्य सरकारने ७० कोटी रुपये मंजूर केले आहेत, ज्याचा उपयोग वीज यंत्रणेच्या आधुनिकीकरणासाठी आणि नवीन सुविधा उभारण्यासाठी होणार आहे. हा निधी परतूर विधानसभा मतदारसंघातील गावांना सक्षम आणि आत्मनिर्भर बनवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल. या योजनेचा भव्य शुभारंभ जालना तालुक्यातील पिंपळवाडी येथे संपन्न झाला. गावाचे सरपंच मा. विकास पालवे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते आणि त्यांनी आमदार मा. बबनराव लोणीकर यांना विशेष निमंत्रण दिले होते. पूर्वनियोजित कार्यक्रमांमुळे आमदार लोणीकर या समारंभाला उपस्थित राहू शकले नाहीत, परंतु त्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पाठपुराव्यामुळे ही योजना प्रत्यक्षात येत आहे. या शुभारंभाने मतदारसंघातील गावकऱ्यांमध्ये उत्साहाचे आणि विकासाचे नवे वातावरण निर्माण झाले आहे. आमदार मा. बबनराव लोणीकर यांनी या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी अथक परिश्रम घेतले आहेत. त्यांनी ऊर्जामंत्री मा. देवेंद्र फडणवीस आणि इन्फ्रा खात्याचे मुख्य अभियंता (एमडी) यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून ७० कोटी रुपयांचा निधी मंजूर करवला. त्यांच्या दूरदृष्टी आणि जनसेवेच्या वचनबद्धतेमुळे परतूर विधानसभा मतदारसंघातील गावे आता वीजपुरवठ्याच्या बाबतीत आत्मनिर्भर होत आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळे गावकरी आणि शेतकरी बांधवांना सक्षम आणि विश्वासार्ह वीज यंत्रणा मिळत आहे. या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे परतूर विधानसभा मतदारसंघातील जनतेने पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी, मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस आणि आमदार मा. बबनराव लोणीकर यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. गावकऱ्यांचा उत्साह आणि समाधान या योजनेच्या यशाचे द्योतक आहे. ही योजना केवळ वीजपुरवठा सुधारणार नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देऊन शेती, लघुउद्योग आणि रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करेल. पहिला टप्पा यशस्वीपणे पूर्ण झाल्यानंतर आता गाव फिटर योजनेचा दुसरा टप्पा लवकरच सुरू होणार आहे. या टप्प्यात उर्वरित गावांमध्ये वीज यंत्रणेचे आधुनिकीकरण आणि ट्रान्सफॉर्मर बसवण्याचे काम वेगाने पूर्ण केले जाईल. यामुळे मतदारसंघातील प्रत्येक गावात २४ तास अखंडित वीजपुरवठा सुनिश्चित होईल, ज्यामुळे ग्रामीण भागातील जीवनमान उंचावेल. गाव फिटर योजना ही केवळ वीजपुरवठ्यापुरती मर्यादित नसून, ग्रामीण भारताच्या सर्वांगीण विकासाचा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. ही योजना परतूर विधानसभा मतदारसंघातील गावांना सशक्त आणि समृद्ध बनवण्यासाठी एक क्रांतिकारी पाऊल आहे. आमदार मा. बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वाखाली आणि केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्याने ही योजना यशस्वीपणे पूर्ण होईल, असा विश्वास परतूर विधानसभा मतदारसंघातील गावागावातील सर्वसामान्य नागरिक व्यक्त करीत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिनानिमित्त शिव प्रेमीच्या वतीने विनम्र अभिवादन



**बीड । प्रतिनिधी**

**छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिनानिमित्त शिवतीर्थ येथे शिवप्रेमी च्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने व हिंदुरुदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या ब्रीदवाक्य प्रमाणे शिवसेनेचे वतीने अभिनव उपक्रमाचे आयोजन शिवसेनेचे उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने यांच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी शेतकऱ्यांना मोफत बी बियाणे वाटप जिल्हाप्रमुख उल्हास भैया गिराम यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना जिल्हा संघटक नितीन भैया धांडे यांनी केले होते.करण्यात आले.**

छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिना निमित्त छत्रपती शिवाजी महाराज स्मारक शिवतीर्थ येथे बीड जिल्ह्यातील शिव प्रेमींच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले यावेळी मोफत बियाणाचे वाटपा च्या कार्यक्रमास डॉक्टर प्रफुल पाटील,बुलंद छावाचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल बहीर, नारायण गवते, राष्ट्रीय छावाचे जिल्हाध्यक्ष युवराज मस्के,ॲड विनायकराव जाधव, गोपाळ धांडे, मधुकर धांडे, सामाजिक कार्यकर्ते पत्रकार अशोक सुखवसे, संजय गोडसे, पंजाबराव येडे, बापूसाहेब शिंदे, संतोष डोंगरे महाराज, श्रीकांत बागलाने, सुरेश ढास,आजिनाथ आदमाने,पंकज बाहेगव्हाणकर सतीश परदेशी राजू हरकुडे गणेश तिपाले दिलीप पवार राहुल जामकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बियाणांची वाटप करण्यात आले यावेळी मोठ्या प्रमाणात शेतकरी व शिवप्रेमी उपस्थित होते.

# पावसाळ्या पूर्वी शहरातील नालेसफाई व स्वच्छतेचे कामे पूर्ण करा-सुहास पाटील

**बीड । पतिनिधी**


**काही दिवसापूर्वी बीड मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे बीडकरांची तारांबळ उडाली अनेकदा शहरातील मुख्य व गल्लीतील रस्ते जलमय झालेले पाहवयास मिळाले होते. नगर पालिका प्रशासन नालेसफाई करत नसल्यानले पाण्याचा निचरा होत नाही. परिणामी बीड शहर सतत जलमय होत आहे. येणाऱ्या काळात मान्सूनचे पाऊस होणार आहेत अशा वेळी बीड शहर जलमय होणार नाही याची दक्षता घेण्यासाठी नगर परिषद प्रशासनाने तात्काळ बीड शहरात मान्सून पूर्व नालेसफाई आणि स्वच्छतेचे काम पूर्ण करावेत असे पत्रकात शिवसंग्राम शहराध्यक्ष सुहास पाटील यांनी म्हटले आहे.**



बीड नगरपालिकेने पावसाची चाहूल लागण्याआधीच संपूर्ण शहरातील नालेसफाईची कामे अत्यंत तातडीने पूर्ण करणे गरजेचे आहे . अवकाळी पावसाने नदी -नाले एक झाले . महाराष्ट्रात सात जूनच्या नंतर मान्सूनचे आगमन होत असते. नगरपालिकेने जलदगतीने पावले उचलून नालीसफाईसाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांचा आढावा घेत संपूर्ण शहरातील नालीसफाई पूर्ण करणे गरजेचे आहे. थोड्या पावसानेच रस्त्यावर पाणी येते आणि गोरगरिबांच्या घरात शिरते . साचलेल्या पाण्यामुळे बीडचे चिखलबीड होऊन जाते . १५ जूनला शाळा सुरू होत आहेत . त्यामुळे पावसाळ्याआधीच शहर स्वच्छ झाले तरच पावसाच्या पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने होईल आणि शहराचे चिखलबीड होण्यापासून वाचवता येईल तसेच नगरपालिका प्रशासनाने नालीसफाईसाठी नियुक्त केलेल्या कामगाराचा आढावा घेतलेला आहे काय ? पावसाची चाहूल लागण्याआधीच ही कामे पूर्ण झाली पाहिजेत. तेव्हा लवकरात -लवकर नगरपालिका प्रशासनाने नालेसफाईची आणि स्वच्छतेचे कामे पूर्ण करावीत आणि नागरिकांच्या घरात पाणी गेल्यास नगर परिषद प्रशासनाने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शिवसंग्रामचे शहराध्यक्ष सुहास पाटील यांनी नगर पालिका प्रशासनाला केली आहे .

# नायगांव ते इस्थळ रस्त्याची झाली चाळणी; प्रवाशी त्रस्त

## रखडलेल्या रस्ते कामासाठी ग्रामस्थ उपोषणाच्या पवित्र्यात



**सारणी । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील अनेक रस्त्यांची सुधारणा होत असताना काही रस्त्यांची मात्र, दुरवस्था झाली आहे. तर काही ठिकाणी होणारी कामे ही ''असून खोळंबा'' अशी झाली आहेत.**

केज तालुक्यातील नायगांव ते इस्थळ या रस्त्याची पूर्णतः चाळणी झालेली असून त्याची अत्यंत दुरवस्था झालेली आहे. त्यात नायगाव ते सौंदना या गावांना जोडणाऱ्या रस्त्याचे काम अनेक महिन्यांपासून रखडलेले आहे. गुत्तेदराने त्या रस्त्याचे बी.बी.एम. पर्यंतचे काम करून सोडून दिले आहे. काही ठिकाणी तर काम होण्याअगोदरच गुडघाभर खड्डे पडले आहेत. बी.बी.एम करून सोडल्याने रस्त्यावरील खडे उघडले पडल्याने प्रवास करताना शरीराची चांगलीच वाट लागत आहे. तसेच सौंदना ते इस्थळ हा रस्ता म्हणजे खड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा अशी अवस्था झाली आहे. अनेक वर्षापासून हा रस्ता याच अवस्थेत आहे. या खड्डेमय रस्त्यावरून जाताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. नायगाव ते इस्थळ या रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण न झाल्यास रस्त्याच्या रखडलेल्या कामासाठी सौंदना, नायगाव येथील ग्रामस्थ उपोषणाच्या पवित्र्यात असल्याचे ग्रामस्थांनी बोलताना सांगितले.

## पान १ वरून...

### राज्यात पुन्हा पावसाचा

आहे. डख यांच्या हवामान अंदाजानुसार कोकण विभागातील ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी या जिल्हयात हलका ते मध्यम पाऊस. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, सोलापूर या जिल्ह्यात घाटभागात वाढलेला पर्जन्य अंदाज. मराठवाडा व विदर्भात नाशिक, धुळे, जळगाव, अमरावती, नागपूर, वर्धा, छ. संभाजीनगर, नांदेड, लातूर, बीड यासह इतर जिल्ह्यात विजेसह मध्यम पाऊस, वाऱ्याचा वेग ३० ते ५० किमी/तास असणार आहे. तर अलर्ट नसलेले जिल्हे

----------

### महाराष्ट्राच्या मनात

ठाकरे हा ब्रँड काय आहे, हे महाराष्ट्राला दिसून येईल अशा शब्दात शिवसैनिक आणि मनसैनिक मनातील इच्छा बोलून दाखवत आहेत. महाराष्ट्राच्या मनात जे आहे, तेच होईल, असे उद्धव ठाकरेंनी म्हटले. त्यामुळे ठाकरे बंधु एकत्र येण्याची सध्या तरी दाट शक्यता दिसत आहे.

------------

### बीडमध्ये उभारणार सहकार

खर्च वाचणार असून नागरिकांसाठी एकाच ठिकाणी सेवा उपलब्ध होणार आहेत. दरम्यान, अनेक वर्षांपासूनचा सहकार संकुलाचा प्रश्न मार्गी लागला असून राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

------------

### एसटी कर्मचाऱ्यांच्या

रुपयांच्यावर गेला आहे. त्या मुळे एसटी प्रशासन हतबल झाले आहे. या महिन्याच्या वेतनासाठी व इतर थकीत देणी यासाठी शासनाकडे एक हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कमेची मागणी करण्यात आली होती पण त्यातील केवळ ३७४ कोटी ९ लाख रुपये इतका निधी सरकारकडून देण्यात आला आहे.

---------------------

### जालिंदर सुपेकरांना अजित

अधिकारी जालिंदर सुपेकर यांचे नाव येत आहे. एकीकडे आरोप होत असताना सुपेकर यांनी मात्र आपला हगवणे प्रकरणाशी काहीही संबंध नसल्याचे म्हटले होते. मात्र त्यानंतर सुपेकर यांचे एक नव्हे तर अनेक प्रकरणे समोर येत आहेत. त्यामुळे सुपेकर यांच्यावर कारवाई होणे अपेक्षित होते, मात्र त्यांच्यावर आतापर्यंत तरी कसलीही कारवाई झालेली नाही. याबाबत बोलताना आरटीआय कार्यकर्ते विजय कुंभार यांनी उपमुख्यमंत्री आणि बीडचे पालकमंत्री अजित पवार यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. कुंभार म्हणाले, जालिंदर सुपेकर यांचे अनेक प्रकरणे बाहेर येत आहेत. त्यांचा बऱ्याच बाबीमध्ये थेट संबंध असल्याचे दिसून येत आहे. मात्र अजित पवार हेच सुपेकरांना पाठीशी घालत असल्याचा आरोप कुंभार यांनी केला आहे.

----------

### दिवाळीपूर्वी घरकुलांचे टार्गेट

रोहयो, महसूल, आणि ग्रामविकास विभाग यांनी परस्पर समन्वय ठेऊन काम केले पाहिजे, म्हणजे दिवाळीपर्यंत लाभार्थ्यांना स्वतःच्या हक्काच्या घरात जाता येईल असे त्या यावेळी म्हणाल्या.

**दिवाळीपूर्वी प्रत्येकाच्या हातात घरकुलाची चावी द्या**

यावेळी ना. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या भाषणात घरकुल योजनांची अंमलबजावणी, गावे आणि गावकऱ्यांचा विकास, तसेच प्रशासनाच्या जबाबदाऱ्या यावर ठामपणे आपली भूमिका मांडली. त्यांनी सांगितले की, मी ग्रामविकास मंत्री म्हणून काम करत असताना घरकुलांच्या योजनेबाबत भरपूर काम केले. त्यावेळी शिर्डी येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते तीन लाख घरकुलांच्या चाव्या वाटप केल्या होत्या. गरीबांच्या व्यथा नरेंद्र मोदींना समजतात. त्यामुळेच देशात घरकुल योजना प्रभावीपणे राबवली जाते आहे. बीड जिल्ह्यात ही योजना प्रभावीपणे राबवली जात आहे. आज आपण देशात घरकुल योजनेच्या बाबतीत दहाव्या क्रमांकावर आहोत आणि विभागीय पातळीवर प्रथम स्थानी आहोत ही बाब अभिमानास्पद आहे, पण अजून मोठ्या प्रमाणावर काम पूर्ण करायचं आहे. दारिद्र्य ही सर्वात मोठी पीडा आहे. स्वतःचं हक्काचं घर ही जीवनात खुप मोठी बाब आहे. यासाठी गावपातळीवर घरकुल टार्गेट पूर्ण करणे अत्यावश्यक आहे. सरपंच व ग्रामसेवक यांनी लाभार्थ्यांची आडवणूक करू नये. चुकीच्या पद्धतीने बीलं काढू नका. दिवाळीपूर्वी घरकुल योजनेचं उद्दिष्ट पूर्ण करा. दिवाळीपूर्वी घरकुलाची चावी लाभार्थ्यांना द्या असेही पंकजाताई यांनी सांगितले.

**निधी अडविण्याचे प्रकार सहन करणार नाही**

शेतकऱ्यांचे विहिरीचे, गोठयाचे पैसे दिले जात नाहीत, त्यात काय लाभ आहे? रोजगार हमी योजनेत (रोहयो) काही ठिकाणी अडवणूक केली जातेय, मला विचारल्याशिवाय बीलं काढायची नाहीत असा दबाव आणला जातो असले प्रकार जिल्ह्यात खपवून घेणार नाही. सीईओ, कलेक्टर तुम्ही कोणाच्याही दबावात येऊ नका. असं जर कुणी करत असेल तर त्याला रेकॉर्डवर घ्या आणि अजित दादांकडे मांडा. आमदार-खासदार हे जनतेच्या सेवेसाठी आहेत. जनतेची विधायक कामे करण्यासाठी आहेत. मी स्वतः असो की जिल्ह्यातील कोणताही लोकप्रतिनिधी असो अशा पद्धतीने काम चालणार नाही. 'अडवा आणि जिरवा' ही संस्कृती बीड जिल्ह्यात चालणार नाही असा स्पष्ट इशाराही यावेळी पंकजाताई मुंडे यांनी यावेळी दिला.

----------

cmyk


# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार दि. ०७ जून २०२५



## छत्रपती शिवाजी महाराज चौकात विद्युत पोलवरची लाईटच नाही



**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक सध्या अंधारात आहे, ज्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. शिवराज्याभिषेक दिनानिमित्त राज्यभरात विविध ठिकाणी प्रभातफेरी, झांजपथक, शिवज्योती आणि महाराजांच्या जयघोषाने वातावरण भारावून गेले आहे. मात्र, पाटोदा शहरातील या ऐतिहासिक चौकात लाईटची व्यवस्था नसल्याने तेथे अंधाराचे साम्राज्य आहे. नागरिकांच्या मते, हे केवळ दुर्लक्ष नाही, तर आपल्या शौर्यशाली इतिहासाचा अपमान आहे. शिवराज्याभिषेक दिनाच्या दिवशी या चौकात लाईटची व्यवस्था केली गेली असती, तर तेथील वातावरण अधिक भव्य आणि प्रेरणादायक झाले असते. स्थानिक प्रशासनाने तातडीने या बाबीची दखल घेऊन चौकात लाईटची व्यवस्था करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. यामुळे पाटोदा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक अधिक उजळेल आणि तेथील ऐतिहासिक महत्त्व अधिक प्रभावीपणे प्रकटेल.नागरिकांच्या या मागणीला स्थानिक प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद देऊन लवकरात लवकर लाईटची व्यवस्था करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# घाटनांदुर-श्रीगोंदा रेल्वे मार्गासाठी डॉ.आदित्य पतकराव यांचा पुढाकार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या घाटनांदुर- श्रीगोंदा रेल्वे मार्ग मंजूर करण्याच्या मागणीसह इतर दोन मागण्यांसाठी महाराष्ट्र, गुजरात आणि कर्नाटक राज्यांचे प्रादेशिक रेल्वे सल्लागार डॉ. आदित्य पतकराव यांनी आग्रह धरला.

आज मुंबईत मध्य रेल्वे मुख्यालयात झालेल्या घ्या बैठकीत या राज्याचे प्रादेशिक सल्लागार म्हणून डॉ.आदित्य पतकराव यांची विशेष उपस्थिती होती. या बैठकीत मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापक धर्मवीर मिना जी यांनी प्रत्येक सदस्यांनी फक्त तीन महत्त्वपुर्ण प्रस्तावाच्या सुचेना कराव्यात असे आवाहन केल्यानंतर या बैठकीत बोलताना घाटनांदुर श्रीगोंदा या रेल्वे मार्गाचा प्रस्ताव तत्कालीन रेल्वेमंत्री या. सुरेश प्रभू यांच्या कार्यकाळात पुढे आला होता. त्यांच्याच कार्यकाळात या नवीन रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण ही पुर्ण करण्यात आले असून आता हा नवीन रेल्वेमार्ग लवकरात लवकर मार्गी लावावा असा आग्रह त्यांनी या बैठकीत धरला. या सोबतच सोलापूर विभागातील मुरुड हे स्थानक एक महत्त्वाचे स्थानक असून मोठे व्यापारी केंद्र आहे.या स्थानकातुन दररोज २ हजार प्रवासी मोठ्या शहराकडे प्रवासाची जातात. या पार्श्वभूमीवर या स्थानकाच्या सर्वांगिण विकासासाठी आणि प्रवासी सुविधा वाढविण्यासाठी एक प्रस्ताव आपण सादर केला असून सदरील प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करण्यात यावी. या सोबतच तिसरी मागणी करतांना प्रादेशिक सदस्य डॉ. आदित्य पतकराव यांनी आपत्कालीन तिकिटासाठी अर्ज प्रक्रियेचे डिजिटायझेशन करण्यात यावे अशी मागणी केली आहे. सध्या सदस्यांना आपत्कालीन तिकिटासाठी अर्ज करावयाचा असल्यास तो फॅक्स ने पाठवण्याची अट आहे. मात्र आजच्या डिजिटल युगात फॅक्स सेवा सर्वसामान्यांसाठी सहज उपलब्ध होत नाही. माझा आग्रह आहे की, फॅक्स ऐवजी इमेल किंवा व्हाटसऍप सारख्या डिजिटल माध्यमांद्वारे अर्ज स्विकारण्याची प्रक्रिया लागू करण्यात यावी, जेणे करून ही सुविधा अधिक सुलभ, वेगवान आणि प्रभावी होईल. आज झालेल्या घ्या बैठकीत प्रादेशिक सदस्य डॉ. आदित्य पतकराव यांनी सुचवलेल्या तीन ही मागण्या अत्यंत प्रमाणे मांडण्यात आल्या असून मराठवाडा आणि सोलापूर विभागातून या मागण्यांचे जोरदार स्वागत करण्यात येत आहे. १९७५ च्या केंद्रीय मंत्रीमंडळात सुरेश प्रभू यांना रेल्वे मंत्रालयाचा कारभार पाहण्याची संधी मिळाली. सुरेश प्रभू यांनी मंत्रीपदाचा पदभार स्वीकारताच अंबाजोगाई शहराला रेल्वे मार्गाच्या नकाशावर आणण्याच्या कामास गती मिळाली. आणि घाटनांदुर श्रीगोंदा हा नवा रेल्वे मार्ग प्रस्तावित झाला. हा नवीन रेल्वेमार्ग घाटनांदुर, अंबाजोगाई, केज, नेकनूर, मांजरसुंबा आणि श्रीगोंदा'' अशा पध्दतीने प्रस्तावित करण्यात आला होता. सुरेश प्रभू एवढ्यावरच थांबले नाहीत तर त्यांनी या रेल्वे मार्गाला मंजुरी ही दिली. पुढे २०१५ साली या रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षण साठी ३४ लाख ५ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आणि १९७६ च्या दिपावलीच्या सुमारास घाटनांदुर, अंबाजोगाई, केज नेकनूर परिसरात सर्वेक्षण करुन अधिका-यांनी या नियोजित रेल्वे मार्गावर रेल्वे सर्वेक्षणाचे अधिकृत स्टोन ही लावले होते.आज या घटनेला बरीच वर्षे झाली तरी हा नियोजित रेल्वेमार्ग अजूनही मध्य रेल्वे विभागाच्या कार्यालयातील फायलीत धुळखात पडूनच होता. आता रेल्वेचे प्रादेशिक संचालक डॉ. आदित्य पतकराव यांनी मांडलेल्या या मागणीमुळे बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई केज नेकनुर मांजरसुंबा या तालुक्यातील नागरीकांच्या आशा पुन्हा पल्लवीत झाल्या आहेत.



# सरकारच्या गुळगुळीत रस्त्याला प्लेन खड्डे

## असे खड्डे देतात अपघाताला निमंत्रण

**सारणी । प्रतिनिधी**

**मांजरसुंबा ते केज हा सिमेंट रस्ता होऊन जवळपास पाच वर्ष होऊन गेले. असे असताना हा नवीन रस्ता दिसायला गुळगुळीत असला तरी या रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे जाणवत आहेत. त्यामुळे हा रस्ता बनवताना निव्वळ निष्काळजीपणा केलेला दिसून येत आहे.**

> केज ते मांजरसुंबा हा रस्ता बर्याच ठिकाणी दबला आहे. तर जेवढे पुल या रस्त्यावर आहेत तेवढ्या ठिकाणी मोठ-मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे भरधाव वाहने या खड्ड्यात आदळतात आणि यात वाहनांचे नुकसान होतेच परंतू आपघातही घडतात. त्यामुळे संबंधित अधिकार्यांनी याकडे लक्ष द्यावे नाही जनताच यांना रस्त्यावर फिरु देणार नाही.
>
> - दिनकर जाधव, अध्यक्ष - राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ (शाखा केज)

हा असे रस्ते बनवताना सरकारकडून कोट्यावधी रुपयाची निविदा निघाली जाते. परंतु प्रत्यक्षात कामे मात्र निव्वळ निकृष्ट दर्जाची झालेली असतात. अशी लाखो करोडो रुपयांचा निधी असलेली कामे जर एवढ्या बोगस पद्धतीने बनवले जात असली तर शासकीय यंत्रणा या रस्त्यावरून दिवसातून कितीतरी वेळेस प्रवास करत असते परंतु या यंत्रणेला काहीच देणे घेणे नसल्यासारखे ही यंत्रणा याच रस्त्यावरून जनतेच्या पैशावर सरकार दरबारी असलेल्या वाहनातून सुसाट धावत असते. परंतु हेच गुळगुळीत दिसणारे रस्ते अनेक ठिकाणी दबले असून डोळ्याने न दिसणारे आणि वाहनातून जाणवणारे खड्डे मात्र या सरकारी यंत्रणेला दिसत नाहीत. याच रस्त्यावरून जात असताना प्रत्येक पुलाच्या ठिकाणी खड्डे हे ठरलेलेच आहेत. त्यामुळे भरधाव वेगात असणाऱ्या वाहनांना हे खड्डे दिसत नाहीत आणि या वाहनांना अपघातासारखा धोका उद्भवण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही, नव्हे अनेक अपघातही असे घडलेले आहेत. अशा सरकारच्या गुळगुळीत दिसणाऱ्या रस्त्यावर मात्र प्लेन खड्डे पाहावयास मिळत आहेत. यामुळे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी या बोगस रस्त्याचे पुन्हा कामे होण्यासाठी आपल्या अंगी असलेला स्वाभिमान जागा करतील का ? असा प्रश्न परिसरातील नागरिक आणि प्रवासी करत आहेत. का निव्वळ टक्केवारीच्या ओझ्याखाली दाबले गेले आहेत हे न समजण्याऐवढे नागरिक नासमज आहे क ? अशी चर्चा नागरिकांमध्ये होत आहे.



पान ६ वरून...

### महायुती सरकारच्या फसव्या

काढला आधीच नुकसानीत आलेल्या शेतकरी अजूनही आर्थिक अडचणीत सापडला त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येत वाढ झाली. गेल्या सात आठ महिन्यात जवळपास १००० शेतकऱ्यांनी आत्महत्या करून आपले जीवन संपवले असले तरीही महायुती सरकार मूग गिळून गप्प बसलेले आहे . अशात सरकारने शेती मालाचे हमीभाव जाहीर केला असून त्यात सोयाबीन चा हमी भाव हा गेल्या वर्षी पेक्षाही कमी दराने जाहीर करून शेतकऱ्यांची थट्टा केली आहे. ऐक रुपयात विमा योजना ही बंद करण्यात आली असून शेतकऱ्यावर हा अन्याय आहे.अश्या महायुती सरकारच्या फसव्या घोषणेची त्यांना आठवण करून देण्याकरिता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने '' क्या हुवा तेरा वादा '' आंदोलन सुरू करत असून या आंदोलना अंतर्गत जिल्हाधिकारी, तहसीलदार, यांना निवेदन देणे, सत्ताधारी पक्षाच्या आमदाराना क्या हुवा तेरा वादा चे निवेदन देणे, जिल्हाप्रमुख, उपजिल्हाप्रमुख, यांनी पाच गावात तीन दिवस गाव बैठक घेऊन महायुती सरकारच्या फसव्या घोषणांचा पाढा वाचणे, रस्ता रोको इत्यादी आंदोलन होणार आहे तरी या आंदोलनात सर्व शिवसेना पदाधिकारी, शेतकरी, सर्व सामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी केले आहे.

### अंबाजोगाईत महेश नवमी

यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते भगवान महेशाचे पुजनाने झाली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अनिल भुतडा, डॉ. नितिन बजाज, डॉ. मोहन मुंदडा, डॉ. मंगला बाहेती, डॉ. शितल दरगड उपस्थित होत्या. यावेळी बोलताना ॲड. कविता मानधने म्हणाल्या की, संस्कार ही वैयक्तीक बाब असून संस्कृती ही सामाजिक बाब आहे. माहेश्वरी समाज हा आपल्या वेगळ्या संस्कृतीमुळे ओळखला जातो. बदलत्या आधुनिक जीवनशैलीत काही बदल अपरिहार्य असले तरी आपली संस्कृती टिकवून ठेवणे गरजेचे आहे. त्यासाठी समाजातील मुलांवर योग्य संस्कार बालपणापासुनच झाले पाहिजेत, जेणेकरून समाजाची आणि पर्यायाने देशाची प्रगती होईल. याप्रसंगी माहेश्वरी समाजातील अक्षय मुंदडा, गिरधारीलाल भराडिया, डॉ. शुभदा लोहिया, अनिकेत लोहिया, सुनंदा मुंदडा, नंदकिशोर भंसाळी, संतोष भंडारी, डॉ. आशिष दरगड, रवी भंसाळी, पवन (बबलू) भराडिया यांचा विविध पदांवर नियुक्ती झाल्यामुळे सत्कार करण्यात आला. तसेच सुनाच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन देणा-यांचा सहकुटुंब सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या समारोप स्नेहभोजनाने झाल. दिवस भराच्या समारंभात माहेश्वरी समाजातील स्त्री पुरुष बहुसंख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तालुका माहेश्वरी सभा, माहेश्वरी युवा संघटन, माहेश्वरी महिला संघटन यांनी परीश्रम घेतले.

### शुभांगी शिंदे आत्महत्या

त्यांना न्यायालयात हजर केले जाणार आहे. मात्र संदीप काचगुंडे हा अद्याप फरार आहे. तो भाजपच्या धारूर तालुकाध्यक्षपदावर कार्यरत असल्यामुळे त्याच्या फरार होण्यात राजकीय पाठबळ आहे? असा संशय उपस्थित होत आहे.

प्राप्त माहितीनुसार, शुभांगीच्या सासरच्या लोकांनी ऑप्टिकल दुकान सुरू करण्यासाठी तिच्या माहेराकडून सातत्याने पैशांची मागणी केली. माहेरच्यांनी यापूर्वी पाच लाख रुपये दिले होते, मात्र आणखी चार लाख रुपयांसाठी शुभांगीवर मानसिक दबाव आणण्यात येत होता. या सततच्या छळाला कंटाळून तिने टोकाचा निर्णय घेतला. बर्दापूर पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत चौकशी सुरू केली आहे. संदीप काचगुंडे याचा शोध घेण्यासाठी विशेष पथक तयार करण्यात आल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. या घटनेमुळे अंबाजोगाई व धारूर परिसरात खळबळ उडाली असून, या प्रकरणात निष्पक्ष व कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

### बनावट पीटीआर द्वारे जागा

प्लॉटची विक्री केली.ही बाब माझी बांधकाम सभापती राजेश साळवे यांनी नगरपालिकेच्या निदर्शनात आणून दिल्यानंतर नगरपालिकेने सदरील बेकायदेशीर दिलेल्या रद्द केल्या या प्रकरणात दोषी असणाऱ्या विरोधात फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी माजलगाव नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली.

### अनिलदादा जगताप यांच्या

विविध सामाजिक उपक्रम राबवत अनिलदादा जगताप यांचे अभिष्टचिंतन केले. तसेच बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने शिवसेना मध्यवर्ती कार्यलय जालना रोड बीड येथे अनिलदादा जगताप यांच्या वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले होते. सायं ५.०० वाजल्यापासून ते उशिरा रात्रीपर्यंत बीड जिल्ह्यासह बाहेरच्या जिल्ह्यातून देखील अनिलदादा जगताप यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी मित्रपरिवार मोठ्या संख्येने येत होता.



## शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे दि.६ जुन रोजी शिवराज्यभिषेक सोहळा साजरा करण्यात आला.यावेळी शहरातील शिव प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाटोदा शहरातील असणाऱ्या शिवाजी महाराज चौकात ६ जून हा छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात यावेळी मान्यवरांच्या हस्ते शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करुन पूजन करण्यात आले.तसेच.छत्रपती शिवाजी महाराज यांना सामुहिक अभिवादन करण्यात आले यावेळी शहरातील शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पहिल्या महिला पो. नि. वर्षा शिंदे यांचा पत्रकारांनी केला सत्कार

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी पोलीस ठाण्याला लाभलेल्या पहिल्या महिला पोलीस अधिकारी वर्षाताई शिंदे यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा वडवणीच्या वतीने शुक्रवारी सत्कार करण्यात आला.

वडवणी पोलीस ठाण्याची निर्मिती होऊन अनेक वर्ष झाले आहेत. आतापर्यंत अनेक पुरुष अधिकारी या ठिकाणी होऊन गेले आहेत. पो. नि. छबुराव सोनवणे, पो. नि. सुरेश साबळे, पो. नि. आनंद कांगुणे सारख्या अधिकाऱ्यांनी आपल्या कर्तुत्वाने वडवणी पोलीस ठाण्यामध्ये आपल्या नावाची छाप तयार केलेली आहे. वडवणी तालुक्याला एक चांगली दिशा देण्याचे काम या तिन्ही अधिकाऱ्यांनी करून दाखवलेले आहे. त्यामुळे त्यांचं नाव तालुक्यातील सर्व सामान्य लोकांच्या तोंडात नेहमीच घेतले जाते. वडवणी पोलीस ठाण्याला अद्याप एकदाही महिला पोलीस अधिकारी लाभल्या नव्हत्या आता पहिल्यांदाच वडवणीला महिला पोलीस अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक वर्षा शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वडवणी ठाण्यामध्ये नियुक्ती होत असताना आपल्या कामाचा धडाका लावला आहे. वडवणी तालुक्याला पुन्हा एकदा चांगली दिशा देण्यासाठी त्यांनी कामाची धडाडी सुरू केली आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा वडवणीच्या वतीने त्यांचा पोलीस ठाण्यात जाऊन झाड, पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष विनायक जाधव, तालुकाध्यक्ष वास्तवचे मुख्य उपसंपादक अशोक निपटे, डिजिटल मीडिया तालुकाध्यक्ष सतीश मजमुले, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे अध्यक्ष प्रा. श्रीनिवास काकडे, तालुका उपाध्यक्ष शांतिनाथ जैन, सचिव अर्जुन मुंडे, पत्रकार ज्ञानेश्वर लंगे, पत्रकार अशोक फपाळ, पत्रकार शंकर झाडे, पत्रकार गंगाभीष्म अंडील, पत्रकार एजाज शेख, पत्रकार अंकुश गवळी, पत्रकार विष्णू डोईफोडे, बाळासाहेब सावंत आदी पत्रकार बांधवांची व सामाजिक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.



> **पत्रकार सहकार्य करतील**
>
> **वडवणी तालुक्यातील पत्रकार बांधव आणि पोलीस प्रशासनाचे मागील पंचवीस वर्षापासूनचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध राहिलेले आहेत. पत्रकारांनी नेहमीच पोलीस प्रशासनाला सहकार्य केलेले आहे. सकारात्मक बातम्या छापून पोलिसांचे मनोबल वाढवलेले आहे. ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी तालुक्यामध्ये चांगलं काम केलं त्यांचा गौरवच पत्रकारांनी केलेला आहे. यापुढेही आम्ही सहकार्य करत राहू अशी ग्वाही पत्रकार संघाच्या वतीने तालुका अध्यक्ष अशोक निपटे यांनी पोलीस निरीक्षक वर्षा शिंदे यांना दिली.**

# बनवसकर यांनी बँकींग क्षेत्रात लिडर तयार केले -सुर्यकांतराव कुलकर्णी

## स्वतःच्या कर्मावर संस्कार करीत, बनवसकर यांनी ग्राहकांना दर्जेदार सेवा दिली - प्रसाददादा चिक्षे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.अंबाजोगाईचे मुख्य कार्यकारी अधिकारी सनतकुमार वि.बनवसकर हे नियत वयोमानानुसार नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांच्या सेवापूर्तीचा सेवा गौरव सोहळा मंगळवार, दिनांक ३ जुन २०२५ रोजी गोपीनाथराव मुंडे सभागृह, खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई येथे दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.अंबाजोगाईच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.

सेवा गौरव सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सुर्यकांतराव कुलकर्णी (कार्यकारी संचालक, एस.ई.डी.टी.पुणे.), तर यावेळी प्रमुख निमंत्रित म्हणून प्रसाददादा चिक्षे (ज्ञान प्रबोधिनी, अंबाजोगाई.) यांच्यासह दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचे विद्यमान अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख, संस्थापक अध्यक्ष प्राचार्य रा.गो.धाट, संचालक इंजि.बिपीन क्षीरसागर, प्राचार्य डॉ.किशन पवार, प्रा.अशोक लोमटे, मकरंद कुलकर्णी सोनेसांगवीकर, बाळासाहेब देशपांडे, जयकरण सुरेशकांबळे, तज्ज्ञ संचालक ॲड.अशोक कुलकर्णी तसेच सत्कारमूर्ती सनतकुमार वि.बनवसकर व सौ.स्वातीताई बनवसकर या मान्यवरांची व्यासपीठावर उपस्थित होती. प्रारंभी दिपप्रज्वलन आणि भारतमाता व पंडित दीनदयाळजी उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेश शेळके (प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी) यांनी केले. त्यांनी सेवा गौरव सोहळा आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. त्यानंर बँकेच्या वतीने अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख, संचालक प्राचार्य डॉ.किशन पवार यांनी मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सनतकुमार



वि.बनवसकर व सौ.स्वातीताई बनवसकर यांचा एकत्रित सन्मान करण्यात आला. सत्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, श्री विघ्नहर्ता मूर्ती, साडी-चोळी, फेटा, शाल, पुष्पगुच्छ व पुष्पहार असे होते. याप्रसंगी ज्येष्ठ बंधू ह.भ.प.शरदराव महाराज बनवसकर, सौ.प्रतिभाताई बनवसकर, मुलगा स्वराज बनवसकर यांच्यासह संपूर्ण बनवसकर परिवार, नातेवाईक आणि मित्र मंडळी उपस्थित होते. या सर्वांचा यथोचित सन्मान बँकेच्या वतीने करण्यात आला. यावेळी सुदर्शन टाक, प्रविण जोशी यांच्या वतीने सौ.प्रतिक्षा जोशी, झंवर काका, संचालक इंजि.बिपीन क्षीरसागर, श्री पेकमवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर आशिर्वादपर सदिच्छा व्यक्त करताना बँकेचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य रा.गो.धाट यांनी सांगितले की, सनतकुमार बनवसकर यांनी बँकेविषयी निखळ निष्ठा ठेवली, कोणाचा अनादर केला नाही. कोणाला दुखावले नाही. प्रामाणिकपणा जोपासत समत्व बुध्दीने झोकून देऊन पण, सहकाराचे तत्व अंगिकारत, चौकटीत राहून बँकेच्या सर्वांगिण विकासासाठी निर्भयपणे कार्य केले. बनवसकर यांचा मला खूप अभिमान आहे. असे गौरवोद्गार प्राचार्य धाट यांनी काढले. तर यावेळी बँकेचे उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख म्हणाले की, बनवसकर यांनी कधी ही नियमबाह्य काम केले नाही. म्हणून त्यांची संपूर्ण कारकीर्द ही यशस्वी ठरली. बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की यांनी बनवसकर यांच्यासोबत काम करताना वयाचे अंतर जाणवले नाही. ते एक प्रामाणिक अधिकारी आहेत. संपूर्ण कारकीर्दीत निरपेक्ष काम केले. बँकेच्या हिताविरूध्द काम केले नाही. कारण, त्यांचा हेतू नेहमीच स्वच्छ होता. बँकेच्या सुरूवाती पासून बनवसकर यांनी अनमोल योगदान दिले असे गौरवोद्गार ॲड.पत्की यांनी काढले. सत्काराला उत्तर देताना सनतकुमार बनवसकर यांनी बँकेतील नौकरीचा पहिला दिवस ते सेवानिवृत्त झालेल्या अखेरच्या दिवसापर्यंत कार्य केले, कोणा-कोणाची मदत, सहकार्य, मार्गदर्शन लाभले याची संबंधितांच्या नांवासह माहिती दिली. कुटुंबातील आई, आत्या, ज्येष्ठ बंधू, भगिनी, पत्नी आणि मुलांचे वेळोवेळी पाठबळ मिळाले असे सांगितले. सुर्यकांत कुलकर्णी आणि संस्थापक अध्यक्ष प्राचार्य रा.गो.धाट यांच्यामुळे आपण घडलो असे सांगून २८ वर्षे बँकेचे तत्कालीन सर्व सन्माननीय अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, अधिकारी, कर्मचारी, ग्राहक आणि हितचिंतक यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

cmyk

# सेंद्रिय शेतीमुळं भविष्य बदलतंय

## आमच्या कार्यक्रमामुळं शेतकरी सक्षम, पतंजलीचा दावा

भारतीय कृषी क्षेत्रात आम्ही नवीन क्रांती सुरु केल्याचा दावा पतंजली आयुर्वेदनं केला आहे. आमचा कृषी उपक्रम शाश्वत शेतीला प्रोत्साहन देतो, जो सेंद्रिय शेती, मातीचे आरोग्य आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक समृद्धीवर लक्ष केंद्रित करतो असेही त्यांनी म्हटलं आहे. पतंजली केवळ शाश्वत शेतीला प्रोत्साहन देऊन शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती मजबूत करत नाही तर पर्यावरण संरक्षण आणि माती आरोग्याला देखील प्राधान्य देत आहे.

पतंजलीचा हा उपक्रम शाश्वत शेतीसाठी एक मोठे परिवर्तनकारी पाऊल मानले जाते. आमचे मुख्य लक्ष सेंद्रिय शेतीवर आहे, जे रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर कमी करून मातीची सुपीकता पुन्हा निर्माण करते. पतंजली किसान समृद्धी कार्यक्रमासारख्या प्रकल्पांद्वारे, शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीच्या आधुनिक तंत्रांचे प्रशिक्षण दिले जाते. याद्वारे, शेतकरी केवळ त्यांच्या पिकांची गुणवत्ता सुधारु शकत नाहीत, तर उत्पादन खर्चात घट आणि उत्पन्नात वाढ देखील पाहू शकतात. या उपक्रमामुळे मातीचे आरोग्य दीर्घकाळ टिकण्यास मदत होते, जे शाश्वत शेतीचा आधार आहे.



**सेंद्रिय उत्पादने रासायनिक रचना सुधारतात**

याशिवाय, पतंजलीचा दावा आहे की त्यांची सेंद्रिय उत्पादने जसे की सेंद्रिय खत, सेंद्रिय सुभूमी आणि धरती का चौकीदार विकसित करण्यात आली आहेत, जी मातीची भौतिक आणि रासायनिक रचना सुधारतात. या उत्पादनांमध्ये ह्युमिक ॲसिड आणि मायकोरायझा सारखे नैसर्गिक घटक असतात, जे पिकांची रोग प्रतिकारशक्ती वाढवतात. हे केवळ पर्यावरणपूरक नाही तर शेतकऱ्यांना रासायनिक खतांवरील अवलंबित्वापासून मुक्त करते, ज्यामुळे त्यांची शेती आर्थिकदृष्ट्या सक्षम होते. पतंजली किसान समृद्धी कार्यक्रमासारख्या प्रकल्पांद्वारे, शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीच्या आधुनिक तंत्रांचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळं शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती होण्यास मदत होते.

**ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्याचा उद्देश**

पतंलजलीने दिलेल्या माहितीनुसार, कंपनीचा हा उपक्रम ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यातही महत्त्वाची भूमिका बजावत आहे. निष्पक्ष व्यापार पद्धतींद्वारे, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांना चांगली किंमत मिळते. ज्यामुळं त्यांचे उत्पन्न वाढते. तसेच, डिजिटल साक्षरता आणि बाजारपेठेपर्यंत पोहोच प्रदान करुन, पतंजली शेतकऱ्यांना स्वावलंबी बनवण्याच्या दिशेने काम करत आहे. या मॉडेलमुळे केवळ वैयक्तिक शेतकऱ्यांनाच फायदा होत नाही तर स्थानिक समुदायांमध्ये रोजगार निर्मिती आणि आर्थिक वाढीला देखील चालना मिळते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५३९ : बक्सर च्या जवळ चौसा या ठिकाणी अफगाण शासक शेरशाह सुरी आणि मुघल शासक बादशाहा हुमायू यांच्यात झालेल्या लढाईत बादशाहा हुमायू यांचा पराभव झाला.
१८९३ : महात्मा गांधीं यांनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली.
१९३८ : डी. सी. ४ प्रकारच्या विमानाचे प्रथम उड्डाण.
१९६५ : अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने परिणित दांपत्याने गर्भनिरोधक साधने वापरणे कायदेशीर ठरवले.
१९७५ : क्रिकेटच्या पहिल्या विश्वकरंडक स्पर्धेस इंग्लंडमध्ये सुरुवात झाली.
१९७९ : रशियातील कापुस्तिनयार येथून भास्कर-१ उपग्रहाचे प्रक्षेपण.
१९८१ : इस्त्रायलने इराकची ओसिराक परमाणू भट्टी नष्ट केली.
१९८५ : विम्बल्डन पुरुष एकेरीचे विजेतेपद १७ व्या वर्षी मिळवणारा बोरिस बेकर हा सर्वात तरुण खेळाडू बनला.
१९९१ : फिलिपाइन्स मधल्या माउंट पिनाटुबो ज्वालामुखीचा उद्रेक.
१९९३ : महात्मा गांधीं यांनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली.
१९९४ : आंतरराष्ट्रीय नाणे निधीच्या उपव्यवस्थापकीय संचालकपदी अर्थतज्ज्ञ प्रभाकर नार्वेकर या प्रथमच एका भारतीयाची नियुक्ती झाली.
२००१ : युनायटेड किंग्डम मधील निवडणुकांत टोनी ब्लेरच्या नेतृत्वाखाली लेबर पार्टीला मोठे बहुमत.
२००४ : शिरोमणी अकाली दल (लाँगोवाल) या राजकीय पक्षाची स्थापना.
२००६ : अल कायदाचा इराकमधील म्होरक्या अबू मुसाब अल झरकावी हा अमेरिकन हवाईदलाने केलेल्या बॉम्बहल्ल्यात ठार झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३७ : अलोइस हिटलर, एडॉल्फ हिटलरचे वडील.
१९१३ : लेखक टीकाकार मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष यांचा जन्म. (मृत्यू: १९ एप्रिल २०१०)
१९१४ : दिग्दर्शक, पटकथाकार, लेखक व पत्रकार ख्वाजा अहमद तथा के. ए. अब्बास यांचा जन्म. (मृत्यू: १ जुन १९८७)
१९१७ : अमेरिकन गायक, संगीतकार निर्माते डीन मार्टिन यांचा जन्म. (मृत्यू: २५ डिसेंबर १९९५)
१९४२ : लिबियाचा हुकूमशहा मुअम्मर गडाफी यांचा जन्म. (मृत्यू: २० ऑक्टोबर २०११)
१९४९ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश सुरिंदरसिंग निज्जर यांचा जन्मदिन
१९५७ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त सरन्यायाधीश व भारतीय सशस्त्र सैन्य न्यायाधिकरणाचे विद्यमान अध्यक्ष न्यायमूर्ती राजेंद्र मेनन यांचा जन्मदिन.
१९५९ : भारतीय अर्थशास्त्रज्ञ आणि भारत सरकारचे माजी मुख्य आर्थिक सल्लागार अरविंद सुब्रमण्यम यांचा जन्मदिन.
१९७४ : महेश भूपती, भारतीय टेनिसपटू.
१९७५ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित सुप्रसिद्ध भारतीय चित्रपट व टेलीव्हिजन मालिका निर्माता आणि दिग्दर्शिका एकता कपूर यांचा जन्मदिन.
१९८१ : अमृता राव, मराठी चित्रपट अभिनेत्री.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२१ : रोमेनियाचे क्रांतिकारी ट्युडोर व्लादिमिरेस्कु यांचे निधन.
१९५४ : ब्रिटीश गणितज्ञ आणि संगणकशास्त्रज्ञ ॲलन ट्युरिंग यांचे निधन. (जन्म: २३ जुन १९१२)
१९७० : ब्रिटिश साहित्यिक इ. एम. फोर्स्टर यांचे निधन. (जन्म: १ जानेवारी १८७९)
१९७८ : रोनाल्ड जॉर्ज व्रेफोर्ड नॉरिश (चित्रित), ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेता.
१९९२ : डॉ. स. ग. मालशे, मराठी वाङ्मयाचे अभ्यासक आणि संशोधक.
१९९२ : नासकार चे सहसंस्थापक बिल फ्रान्स सीनियर यांचे निधन. (जन्म: २६ सप्टेंबर १९०९)
१९९८ : शशिकांत नार्वेकर, गोमंतक मराठी अकादमीचे अध्यक्ष.
२००० : बालसाहित्यिक गोपीनाथ तळवलकर यांचे निधन. (जन्म: २९ नोव्हेंबर १९०७)
२००२ : बी. डी. जत्ती, भारतीय उपराष्ट्रपती.
२०२० : चिरंजीवी सर्जा (भारतीय कन्नड चित्रपट अभिनेते, जन्म: १ ऑक्टोबर १९८४).

# रताळ्याच्या शेतीतून करु शकता लाखोंची कमाई!

भारतीय शेतकरी आता पारंपरिक शेती सोडून वेगवेगळ्या पिकांच्या लागवडीवर भर देत आहेत, आणि त्यात यशस्वीही होत आहेत. शेतकरी रताळ्यांसह अनेक प्रकारची फळे आणि भाज्यांची लागवड करतात. असेच एक वेगळे पीक म्हणजे रताळे. दिसायला आणि चवीला बटाट्यासारखे असले तरी त्यात बटाट्यापेक्षा जास्त गोडवा आणि स्टार्च आहे. याशिवाय रताळ्यामध्ये जीवनसत्त्वेही चांगल्या प्रमाणात आढळतात. याचे सेवन आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते, यामुळे चेहऱ्यावर चमक येते आणि केसांची वाढ होते. वाढत्या मागणीमुळे रताळे लागवडीमुळे शेतकऱ्यांना चांगला नफा मिळू शकतो.

रताळे लागवडीचा हंगाम : रताळे हे सदाहरित पीक आहे, ज्याचे उत्पादन शेतकऱ्यांना वर्षभर मिळू शकते. पण चांगल्या उत्पादनासाठी उन्हाळी आणि खरीप हंगामात या पिकाची लागवड केली जाते. शेतकरी जून ते ऑगस्ट दरम्यान रोपे लावतात. खरीप हंगामातील पिकांसह रताळ्याचे पीक तयार होते. डिसेंबर-जानेवारी महिन्यात धानाची दुसरी कापणी झाल्यानंतर शेतकरी रताळ्याची पेरणी करतात.

रताळ्याच्या सुधारित जाती : रताळ्याच्या ४०० हून अधिक जाती असल्या तरी देशातील बहुतांश शेतकऱ्यांनी लागवड केलेल्या जातींमध्ये पुसा गोल्डन, पुसा व्हाईट, कोकण अश्विनी, राजेंद्र गोड बटाटा-५, काळमेघ, श्री रत्न क्रॉस-४, श्रीभद्र या जातींचा समावेश आहे. श्री अरुण, श्री वरुण, श्रीवर्धिनी, श्री नंदिनी आणि वर्षा यांचा सुद्धा सुधारित जातीत समावेश आहे. रताळ्याच्या या सुधारित जाती ११० ते १२० दिवसात तयार होतात.

लागवडीसाठी हवामान आणि माती : रताळ्याच्या लागवडीसाठी चिकणमाती किंवा चिकण मातीयुक्त जमीन सर्वोत्तम मानली जाते, जी सेंद्रिय घटकांनी समृद्ध आहे. लागवडीसाठी, मातीचा पीएच ५.८ ते ६.७ च्या दरम्यान असावा. रताळ्याच्या लागवडीसाठी सौम्य आणि समशीतोष्ण हवामान सर्वात योग्य आहे. लागवडीसाठी सर्वात योग्य तापमान २१ ते २७ अंश सेल्सिअस आणि पर्जन्यमान ७५ ते १५० सेंटीमीटर असावे.



रताळ्याची लागवड पद्धती : रताळ्याची लागवड करण्यासाठी प्रथम शेत नांगरून घ्यावे. शेत काही दिवस उघडे ठेवा म्हणजे जमिनीतील कीटक, पिकांचे जुने अवशेष आणि तण नष्ट होतील. हेक्टरी १८० ते २०० क्विंटल कुजलेले शेणखत शेतात टाकावे. यानंतर रोटाव्हेटरच्या सहाय्याने शेताची २ ते ३ वेळा नांगरणी करून माती भुसभुशीत करावी. शेत तयार झाल्यानंतर, रताळे पेरा. रोपवाटिकेत तयार केलेल्या रोपांद्वारे सुद्धा लागवड करता येते. त्याची रोपे एक महिना अगोदर तयार केली जातात, रोपवाटिकेत बिया पेरून रोपे तयार केली जातात. ही रोपे उपटून शेतात लावले जातात. रताळ्याची रोपे शेताच्या कड्यांवर लावली असल्यास, इतर वनस्पतींपासून या रोपांचे अंतर सुमारे एक फूट असावे. रताळ्याच्या रोपांची २० सेमी खोलीवर पेरणी करावी. रोपे लावल्यानंतर ते सर्व बाजूंनी मातीने झाकावे. रोपे सपाट जमिनीवर लावावे, दोन ओळीतील अंतर सुमारे २ फूट ठेवावे.

रताळ्याच्या शेतीतून नफा : रताळ्याच्या सुधारित वाणांची निवड आणि सुधारित लागवड पद्धती वापरल्यास रताळे पिकातून चांगला नफा मिळू शकतो. एका अंदाजानुसार, एक हेक्टरमध्ये रताळ्याची लागवड केल्यास त्यातून सुमारे २५ टन उत्पादन मिळू शकते. बाजारात रताळ्याचा भाव १० रुपये किलो किंवा त्याहून अधिक आहे. जर तुम्ही २५ टन रताळे विकले तरी २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न मिळू शकते.

# आधुनिक पद्धतीने भुईमूग लागवड; एकरी विक्रमी १७ क्विंटल उत्पादन!

पुणे : शेती करताना शेतकरी प्रामुख्याने अधिक बाजारभाव मिळवून देणारी पिके घेण्याकडे ओढले जात आहे. त्यातच तेलबिया पिकांना पाहिजे तसा भाव मिळत नसल्याने अनेक शेतकरी भुईमूग, सोयाबीन या पिकांपासून दुरावले जात आहे. मात्र, अशातही काही शेतकरी हे तेलबिया पिकांचे भरघोस उत्पादन घेत आहे. आज आपण अशाच एका भुईमूग उत्पादक शेतकऱ्याची यशोगाथा पाहणार आहोत. ज्यांनी भर उन्हाळ्यात भुईमूग पिकाची लागवड करून, त्यातून त्यांनी एकरी विक्रमी १७ क्विंटल भुईमुगाचे उत्पादन घेतले आहे.


अंकित भोयर असे या शेतकऱ्याचे नाव असून, ते चंद्रपूर राजुरा तालुक्यातील पाचगाव येथील रहिवासी आहे. सध्याच्या घडीला शेतकरी तेलबिया पिकांची प्रामुख्याने पद्धतीने लागवड करतात. मात्र, प्रगतिशील शेतकरी अंकित भोयर यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेती करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी एक एकर शेतात आधुनिक पद्धतीने भुईमूग पिकाची लागवड केली. विशेष म्हणजे त्यांना भर उन्हाळ्यात विक्रमी उत्पादन देखील मिळाले आहे.

**किती मिळाले उत्पादन?**

सामान्यपणे भुईमूग तीन महिन्यांचे उन्हाळी पीक आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापर करून भुईमूग पीक घेतले तर त्याला कमी खर्च येतो. आणि उत्पादनही चांगले होते. असे शेतकरी अंकित भोयर सांगतात. त्यांना यंदा एका एकरात १७ क्विंटल भुईमुगाचे उत्पादन मिळाले आहे. ज्यास सध्या बाजारात सहा हजार रुपये प्रति क्विंटलचा दर मिळाला आहे. ज्यामुळे कमी उत्पन्न मिळणाऱ्या भुईमूग पिकातून त्यांनी नियोजनपूर्वक आर्थिक प्रगती साधली आहे.

आधुनिक पद्धतीचा अंगीकार :

''सध्याच्या घडीला शेतकऱ्यांनी कपाशी, सोयाबीन, गहू, हरभरा पिकांसोबत आधुनिक शेती पद्धतीने पीक घेतल्यास उत्पादन वाढले तर नक्कीच फायदा होतो. त्यामुळे सध्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेती करणे गरजेचे झाले आहे. बाजारपेठेत विविध प्रकारच्या जातींचे वाण उपलब्ध आहेत. शेतकऱ्यांनी उत्पादन वाढविण्यासाठी कृषितज्ज्ञांचा सल्ला घेऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला. तर शेतकऱ्यांना त्याचा मोठा फायदा होतो. प्रत्येक शेतकऱ्यांनी आता आधुनिक पद्धतीने शेती केली तर शेतकरी नक्कीच समृद्ध होईल.'' असा सल्ला शेतकरी अंकित भोयर यांनी शेवटी शेतकऱ्यांना दिला आहे.



# मेथी लागवड माहिती तंत्रज्ञान

दैनंदिन आहारामध्ये मेथी या पालेभाजीचा वापर तुम्ही केलाच असेल. मेथी पिक हे कमी खर्चात जास्त उत्पन्न देणारे पीक आहे. मेथी हे पालेभाज्यातील महाराष्ट्रातील लोकप्रिय पालेभाजी आहे. दैनंदिन आहारात मेथीचा वापर आपल्या शरीरासाठी उपयुक्त ठरतो. त्यामुळे या पिकाला वर्षभर चांगली मागणी असते. या पिकाची लागवड करून चांगला नफा मिळवता येतो.

जमीनीची निवड : मेथी हे कमी कालावधीचे पीक आहे. त्यामुळे योग्य जमिनीची निवड आवश्यक आहे. मेथी पिकाच्या लागवडीसाठी मध्यम ते काळी आणि पाण्याचा योग्य जमीन लागते. चुनखडीच्या तसेच पाणी साठून राहणाऱ्या जमिनीत मेथी पीक चांगले येत नाही.

लागवडीचा हंगाम : मेथी या पिकाची लागवड वर्षभर करता येते. पावसाळ्यात, उन्हाळ्यात आणि थंडीच्या सुरुवातीलाही मेथी पिकाची लागवड करता येते आणि या काळात लागवड केलेल्या मेथीला बाजारभाव पण योग्य मिळतो. भाजीचा सतत पुरवठा होत राहावा यासाठी टप्प्या-टप्याने मेथी पिकाची लागवड करून वर्षभर मेथी पिकाची उपलब्धता करता येऊ शकते.



जमिनीची मशागत : लागवड करण्याआधी जमिनीची चांगली आडवी उभी नांगरट करून घ्यावी. नांगरणी नंतर रोटरच्या मदतीने जमीन भुसभुशीत करून घ्यावी.

लागवड अंतर : मेथी या पिकाची दोन प्रकारे लागवड करता येते.

मुख्य पीक म्हणून आणि आंतरपीक म्हणून. मुख्य पीक म्हणून लागवड करायची असल्यास तीन मिटर बाय दोन मीटर च्या सपाट वाफ्यामध्ये लागवड करतात. दोन ओळींमध्ये पंधरा ते वीस सेंटीमीटर चे अंतर ठेवून मेथीचे बी फेकून लागवड करतात. तसेच आंतरपीक म्हणून मेथी पिकाची लागवड करायची असल्यास मुख्य पिकातील मोकळ्या जागेत असणाऱ्या वीस ते तीन सेंटीमीटर जागेत लागवड करतात.

बियाणांचे प्रमाण आणि बीजप्रक्रिया : मेथी पिकाच्या मुख्य पीक म्हणून एक हेक्टर लागवडीसाठी पंचवीस ते तीन किलो बियाणे लागते. तसेच आंतरपीक घेताना आवश्यकतेनुसार बियाण्यांचे प्रमाण घ्यावे. बियाणे पेरताना एकसारखे आणि पातळ सोडावे. बिजप्रक्रिया करताना बुरशीनाशक ३ ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणे बियाण्यास चोळावे.

सुधारित जाती : फुले कस्तुरी : फुले कस्तुरी हे वाण महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे संशोधित करण्यात आले आहे. या वाण्याचे वैशिष्ट्य म्हणजे या वाणाला जास्त फुटवे असतात आणि जास्त उत्पादन क्षमता आहे. हे वाण मर आणि नागअलीळा प्रतिकूल वाण आहे. या मेथीची उगवण लागवड केल्यावर सात ते आठ दिवसात होते. कस्तुरी सिलेक्शन : कस्तुरी सिलेक्शन हे वाण भारतीय कृषी संशोधन संस्था नवी दिल्ली येथे संशोधित करण्यात आले आहे. हे वाण खायला चविष्ट असते. या वाणाची पाने गोलाकार आणि हिरवी असतात. या वाणाची रोपे लहान आणि नाजूक असल्याने या वाणाला बाजारात चांगली मागणी असते. या मेथीची उगवण लागवड केल्यावर तीन ते चार दिवसात होते.

आंतर मशागत : कमी कालावधीचे पीक असल्याने मेथी पिकामध्ये जास्त आंतरमशागतीची गरज नसते. तण व्यवस्थापन करणे आवश्यक असते. लागवडीनंतर पंधरा ते वीस दिवसाच्या नंतर खुरपणी करून घ्यावी. मेथी पिकामध्ये तण वाढू देऊ नये.

खते आणि फवारणी : मेथी पिकाला सुरुवातीला २० किलो नत्र आणि नंतर खुरपणी झाल्यानंतर २० किलो नत्र हेक्टरी या प्रमाणात द्यावे. यामुळे पिकाची वाढ जोमदार होते. तसेच पेरणीनंतर वीस ते पंचवीस दिवसांनी दहा लिटर पाण्यात २०० ग्रॅम युरिया मिसळून त्याची फवारणी करावी .यामुळे उत्पादनात वाढ होते. मेथी या पिकावर जास्त रोगांचा पादुर्भाव होत नाही. या पिकावर प्रामुख्याने पाने खाणारी अळी (लीप मायनर) आणि मावा या किडींचा प्रादुर्भाव अधिक प्रमाणात आढळतो. मावा किड काळ्या रंगाची असते. मावा कीड पानाच्या खालच्या भागावर आणि शेंड्यावरून मोठ्या प्रमाणात पानातील रस शोषून घेते. त्यामुळे रोपे खराब होऊन रोपांची प्रत खराब होते. पाने खाणारी ही पानावरील रस शोषून घेत वेडीवाकडी पुढे पुढे जाते. त्यामुळे पानावर पांढरया रंगाच्या वेड्यावाकड्या रेषा दिसतात आणि रोपाची प्रत खराब होते. किडीच्या नियंत्रणासाठी पीक लहान अवस्थेत असताना पिकावर निंबोळी अर्काची आणि डायमियोट ची फवारणी करावी.

पाणी व्यवस्थापन : मेथी पिकाला नियमित पाणी द्यावे . मेथी पिकाला पाण्याची जास्त आवश्यकता असते. मेथीचे चांगले उत्पन्न घेण्यासाठी आणि भाजीच्या दर्जेदार कॉलिटी साठी मेथी पिकाला चार ते पाच दिवसांनी पाणी द्यावे. मेथी पिकाला पाण्याचा ताण पडू देऊ नये. पिकाला पाण्याचा ताण पडल्यास पिकाची वाढ कमी होऊन उत्पादनावर परिणाम होतो. मेथी या पिकाचे योग्य नियोजन केले तर या पिकातून योग्य नफा मिळवता येतो.

# पोलिस कर्मचाऱ्यांना पोलिस मित्र ग्रुपच्यावतीने निरोप समारंभ

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नेकनुर पोलिस स्टेशन अंतर्गत लिंबागणेश पोलिस चौकीतील बदली झालेल्या पोलिस हेड कॉन्स्टेबल संतोष राऊत, बाबासाहेब डोंगरे, नवनाथ मुंढे,एम तांदळे यांचा पोखरी (घाट) चे सरपंच बिभीषण मुळीक,महाजनवाडीचे सरपंच विश्वंभर गिरी यांच्या प्रमुख उपस्थितीत आज दि.०६ जुन शुक्रवार रोजी पोलिस मित्र ग्रुप लिंबागणेश यांच्या वतीने ग्रामपंचायत कार्यालय लिंबागणेश येथे शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी कार्यक्रमाची प्रस्तावना व सूत्रसंचालन पत्रकार हरीओम क्षीरसागर यांनी केले तर आभारप्रदर्शन ग्रामपंचायत सदस्य अशोक जाधव यांनी केले.यावेळी कार्यक्रमास आवर्जून उपस्थित विश्वंभर गिरी, ग्रामपंचायत सदस्य समीर शेख यांनी मनोगत व्यक्त केले तर सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी पोलिस कर्मचारी यांनी केलेल्या प्रशंसनीय कामाचा लेखाजोखा मांडत ग्रामस्थांच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.बदली झालेल्या कर्मचाऱ्यांनी आपल्या कार्यकाळात आलेले अनुभव मांडत ग्रामस्थांनी केलेल्या सहकार्याबद्दल व निरोप समारंभाबद्दल आभार मानले.

पोलिस अधीक्षक बीड नवनीत कांवत यांनी बीड मधील पोलिस दलामध्ये फेरबदल करत दि.२१ मे रोजी ६०६ पोलिस कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या. या बदल्यांमध्ये पोलिस हेडकॉन्स्टेबल ते उपनिरीक्षक या स्तरावरील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

नेकनुर पोलिस ठाणे अंतर्गत लिंबागणेश पोलिस चौकी मधील पोलिस हेड कॉन्स्टेबल संतोष राऊत यांची शिवाजीनगर पोलिस स्टेशन बीड,बाबासाहेब डोंगरे व नवनाथ मुंढे यांची अंबेजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन येथे तर मधुकर तांदळे यांची पाटोदा पोलिस स्टेशन येथे बदली करण्यात आली आहे.

पोलिस मित्र ग्रुप लिंबागणेश यांच्या वतीने शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा आदरपूर्वक सन्मान करत जड अंतःकरणाने निरोप देण्यात आला.यावेळी माजी सैनिक मारोती रणखांब, सय्यद बशीर, विक्रांत वाणी,अँड.गणेश वाणी, औदुंबर नाईकवाडे, सय्यद अख्तर, बाळु कदम,तुकाराम गायकवाड, तुळशीराम पवार,बालाजी निर्मळ, जितेंद्र निर्मळ, कृष्णा वायभट, योगेश शिंदे,केशव गिरे, आदी ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर ग्रामस्थांची उपस्थिती होती.



## नवनियुक्त पोलिस कर्मचारी यांचे स्वागत

लिंबागणेश पोलिस चौकीतील जुन्या सर्वच कर्मचाऱ्यांची बदली झाल्याने नव्याने रूजू झालेले सहाय्यक फौजदार लिंबागणेश बीट बाबासाहेब राख, सहाय्यक फौजदार पिंपळवाडी बीट गोविंद बडे, पो.हवालदार सतिश राऊत मदतनीस लिंबागणेश, पो.हवालदार सुदाम शेलार मदतनीस पिंपळवाडी यांचे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

# साडेसहा कोटी खर्च करूनही पाटोदा-शंभर चिरा रस्ता उखडला



पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा ते शंभर चे रस्ता पावसाळ्यापूर्वीच पडला असून रोहनधारकांना जाता येता त्रास सहन करावा लागत आहे या रस्त्याचे काम गेले एक वर्षभरापासून चालू असून तरीही साडेसहा कोटी खर्च करूनही रस्त्याची एक वर्षाच्या आत दूर दशा झाली अनेक अपघातही झाले आहेत मोठ-मोठे खड्डे पडले आहेत पाटोदा ते शंभर ची रा पूर्णपणे उकडून गेला असून कुठेही चांगला रस्ता शिल्लक राहिला नाही हा रस्ता दर्जेदार व्हावा अशी मागणी डॉक्टर प्रीतम मुंडे यांच्याकडे पाटोदा येथील नागरिकांनी केली होती माजी खासदार डॉक्टर प्रीतम मुंडे यांनी केंद्र सरकारकडे पाठपुरा केल्यामुळे हा रस्ता मंजूर करून आणला होता प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत केंद्रीय ग्रामविकास मंत्राने या रस्त्याला मंजुरी दिली होती चार किमी २०० मीटर लांबीच्या रस्त्यासाठी सहा कोटी ६१ लाख रुपये खर्च करण्यात आले होते या कामाचे उद्घाटन डॉक्टर माजी खासदार प्रीतम मुंडे यांनी केले होते ७ जानेवारी २०२४ रोजी उद्घाटन करण्यात आले होते सदर कंत्राटदार दराने हे काम धिम्या गतीने करून पहिला लेयर कमी डांबर वापरून टाकला या रस्त्यात निकृष्ट दर्जाचा मटेरियल वापरण्यात आले आहे पावसाळ्यापूर्वीच या रस्त्याची पूर्णपणे वाट लागलेली आहे पावसाळा सुरू होण्यापूर्वी या रस्त्याचे काम पूर्ण उत्कृष्ट दर्जाचे होणे अपेक्षित होते पण तसे झाले नाही जागोजागी खड्डे पडले असून त्याची पूर्ण पूर्ण अवस्था झाली आहे अवकाळी पावसामुळे खड्डे पडून त्यात पाणी साचले असून अपघात होण्याची दाट शक्यता आहे या रस्त्याकडे पाटोद्यातील पुढाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज असून कंत्राटदार कोण हा रस्ता परत व्यवस्थित करून घ्यावी अशी पाटोद्यातील जनतेची मागणी आहे

# माजलगाव मध्ये भारतीय जनता पार्टीच्या वतीने पर्यावरण दिन साजरा



माजलगाव। प्रतिनिधी

जागतिक पर्यावरण दिन २०२५ निमित्त भारतीय जनता पार्टी माजलगाव तालुक्याच्या वतीने कार्यक्रम आयोजित केला होता. हनुमान मंदिर,हनुमान चौक येथे महारुद्र हनुमानाचे दर्शन घेऊन त्या ठिकाणी कापडी पिशवी ठेवून कार्यक्रमाची सुरुवात केली व छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे या अभियानाची सांगता केली. यामध्ये प्लास्टिकचा त्याग करून कापडी पिशव्या वापरण्याचा संकल्प केला व माजलगाव शहरांमध्ये विविध फळ गाड्यावाले , विविध भाजी मंडईसह विविध दुकानावर एक हजार कापडी पिशवी बॅग दिल्या, यावेळी माजलगाव शहरातील अनेक फळ गाड्यावाले व व्यापारी वर्गातील अनेक नागरिकांनी यानंतर आम्ही प्लास्टिकचा वापर करणार नाहीत असा संकल्प करत ग्वाही दिली. पर्यावरनाचा समतोल राखणे खूप महत्त्वाचे आहे व कॅरीबॅग प्लास्टिक मुळे शरीराला होणारे आजार देखील खूप गंभीर आहेत, स्वच्छता हीच सेवा प्लॅस्टिक थर्माकोल मुक्त माजलगाव, प्लास्टिक पिशवी हटवूया ,पर्यावरणाचे रक्षण करूया अशा आशयाचे बॅनर फलक च्या माध्यमातून कापडी बॅग वाटप करताना सर्वांना सांगून कॅरीबॅग मुक्त होणे काळाची गरज आहे अशी माहिती देत प्रसार केला . येणाऱ्या काळात पर्यावरणाचा समतोल राहावा म्हणून आपण एक सुजाण नागरिक म्हणून तालुक्यातील सर्व नागरिकांनीच सहकार्य केले पाहिजे व संतांनी सांगितल्याप्रमाणे झाडे लावा झाडे जगवा,वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे,व्हावया पर्जन्यवृष्टी वृक्षांनी सजवासृष्टी,संकल्प नवे कृती करूया वसुंधरा वाचवण्यासाठी कटिबद्ध होऊया याप्रमाणे माजलगाव शहरात गजानन मंदिर येथील सिद्धिविनायक मंदिराच्या ठिकाणी वड ,कनेरी सह विविध झाडे लावली.येणाऱ्या काळात आपल्या मातृभूमीच्या व आपल्या वाढदिवसाच्या दिवशी ज्या ज्या ठिकाणी वृक्षारोपणसाठी जागा आहे अशा ठिकाणी झाडे लावण्याचा संकल्प भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते व उपस्थित अनेक नागरिकांनी याप्रसंगी केला.या अभियानाच्या कार्यक्रम प्रसंगी भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष अरुण राऊत,माजी नगराध्यक्ष डॉ अशोक तिडके , प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ.प्रशांत पाटील,भाजपा शहर मंडळाध्यक्ष विनायक रत्नपारखी,किट्टी आडगाव मंडळ तालुका अध्यक्ष रूपाली कचरे, पात्रुड मंडळ तालुका अध्यक्ष डॉ. अभिजीत सोळंके, दत्ता महाजन, कैलास खुरपे, बाळासाहेब क्षीरसागर,अनंत कुलकर्णी,सिद्धेश्वर राठोड,सूर्यकांत दराडे,प्रल्हाद दळवी यासह भाजपाचे पदाधिकारी शक्ती प्रमुख या अभियानाच्या कार्यक्रम प्रसंगी उपस्थित होते.

# सेतू सुविधा केंद्रात दरफलक लावा-गणेश शेवाळे

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील सेतू सुविधा केंद्रांमधून विद्यार्थ्यां व शेतकऱ्यांकडून अनधिकृतपणे अधिक शुल्क आकारले जात असून, ही लूट त्वरित थांबवण्यासाठी प्रत्येक सेतू केंद्रात शासकीय दरफलक लावण्यात यावेत, अशी जोरदार मागणी सामाजिक कार्यकर्ते गणेश शेवाळे यांनी तहसील प्रशासनाकडे प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

गणेश शेवाळे यांनी सांगितले की, शासनाने विविध प्रमाणपत्रे, दाखले व अन्य सेवांसाठी ठराविक दर निश्चित केले आहेत. परंतु प्रत्यक्षात अनेक सेतू केंद्र चालक या दरांपेक्षा अधिक शुल्क आकारून आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्ग विशेषतः विद्यार्थी व शेतकरी यांची लूट करत आहेत.यामुळे ''नागरिकांच्या सेवेसाठी सुरू करण्यात आलेली ही केंद्रेच आता लुटीचे साधन ठरत आहेत,'' असे तीव्र शब्दांत त्यांनी चिंता व्यक्त केली. असून सर्व सेतू सुविधा केंद्रांमध्ये दरफलक सक्तीने लावल्यास नागरिकांना नेमके दर माहित होतील आणि फसवणुकीला आळा बसेल, असेही गणेश शेवाळे यांनी नमूद केले. पाटोदा तहसील प्रशासनाने या प्रकाराकडे गांभीर्याने लक्ष देत नियमित तपासणी करून दोषी केंद्र चालकांवर कठोर कारवाई करतील का असा मोठा प्रश्न गणेश शेवाळे यांनी उपस्थित केली आहे. तसेच अनेक सेतू सुविधा केंद्र हे स्वतः चे गावं सोडून पाटोदा शहरात थान मांडुन बसले आहेत या मुळे शेतकरी यांची लुट होत आहे.या प्रकारामुळे तालुक्यातील नागरिकांमध्ये प्रचंड नाराजीचे वातावरण असून, ''शासकीय सेवा खऱ्या अर्थाने सर्वसामान्य नागरिकांसाठी आहेत का?'' असा सवाल उपस्थित होऊ लागला आहे.

# वसंतदादा पाटील महाविद्यालयात शिवराज्याभिषेक दिन साजरा



पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ६ जून रोजी शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. त्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण संपन्न झाले.

याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी कृष्णा शेवंते, नितीन साळुंके, बाबासाहेब नाईकनवरे, जयराम राऊत, भाऊसाहेब यादव, श्रीकृष्ण यादव, माधुरी पुराणिक, रेणुका जाधव, दिलीप डाके, रोहित गायकवाड, अमोल आरे, अमोल रोमण, खाडे आदी कर्मचारी उपस्थित होते.

# दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यास कृषी पदविकेची संधी

बीड। प्रतिनिधी

महाराष्ट्रात नियमित कृषि शिक्षण घेऊ न शकणार्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकरिता यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक अंतर्गत मुक्त कृषि शिक्षण केंद्र, सौ. के.एस.के. (काकू) कृषि महाविद्यालय, म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड. येथे नववी उत्तीर्ण विद्यार्थी देखील झेरॉक्स कागदपत्रावर माळी प्रशिक्षण हा एक वर्षाचा कोर्स पूर्ण करून पुढे कृषि पदविकेचे शिक्षण पूर्ण करू शकतो. कृषी शिक्षण पूर्ण केल्यानंतर अशा विद्यार्थ्यांना अनेक ठिकाणी शासकीय तसेच खाजगी नोकरीची व व्यवसायाची संधी उपलब्ध आहे.

जसे की कृषी विभाग, कृषी विद्यापीठ, कृषी कंपनी तसेच स्वतःचा कृषी व्यवसाय सुरू करण्यासाठी कृषी शिक्षण अतिशय महत्त्वाचे आहे. त्यासाठी सर्व परिसरातील विद्यार्थ्यांना आवाहन आहे की आपण आपला प्रवेश आजच निश्चित करा. या कृषि महाविद्यालयात विविध प्रकारचे कृषी अभ्यासक्रम चालविले जात असून यामध्ये कृषि पदविके अंतर्गत उद्यान विद्या पदविका, कृषि व्यवसाय व्यवस्थापन पदविका, कृषि पत्रकारिता पदविका, फळबाग उत्पादन पदविका, भाजीपाला उत्पादन पदविका आणि फुलशेती उत्पादन पदविका अशा विविध शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना शासकीय तसेच खाजगी नोकरीमध्ये तात्काळ संधी मिळतात. प्रवेश घेण्यासाठी ऑनलाइन नोंदणी दिनांक ०१/०६/२०२५ पासून चालू झालेले आहेत. तरी आपण ऑनलाइन नोंदणीसाठी प्रा. बी.बी. तांबोळकर किंवा प्रा. ए.पी. ढोरमारे यांच्याशी संपर्क साधावा.

# उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाच्या वतीने मोफत बियाणे वाटप

बीड। प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिनानिमित्त शिवतीर्थ येथे शिवप्रेमी च्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने व हिंदुरुदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या ब्रीदवाक्य प्रमाणे शिवसेनेचे वतीने अभिनव उपक्रमाचे आयोजन शिवसेनेचे उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने यांच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी शेतकऱ्यांना मोफत बी बियाणे वाटप जिल्हाप्रमुख उल्हास भैया गिराम यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना जिल्हा संघटक नितीन भैया धांडे यांनी केले होते.करण्यात आले.



छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिना निमित्त छत्रपती शिवाजी महाराज स्मारक शिवतीर्थ येथे बीड जिल्ह्यातील शिव प्रेमींच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले यावेळी मोफत बियाणाचे वाटपा च्या कार्यक्रमास डॉक्टर प्रफुल पाटील,बुलंद छावाचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल बहीर, नारायण गवते, राष्ट्रीय छावाचे जिल्हाध्यक्ष युवराज मस्के,अॅड विनायकराव जाधव, गोपाळ धांडे, मधुकर धांडे, सामाजिक कार्यकर्ते पत्रकार अशोक सुखवसे, संजय गोडसे, पंजाबराव येडे, बापूसाहेब शिंदे, संतोष डोंगरे महाराज, श्रीकांत बागलाने, सुरेश ढास,आजिनाथ आदमाने,पंकज बाहेगव्हाणकर सतीश परदेशी राजू हरकुडे गणेश तिपाले दिलीप पवार राहुल जामकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बियाणांची वाटप करण्यात आले यावेळी मोठ्या प्रमाणात शेतकरी व शिवप्रेमी उपस्थित होते.

# अंथरवन पिंपरी येथे पर्यावरण दिन व शिवराज्याभिषेक दिन वृक्षारोपण करून साजरा

बीड । प्रतिनिधी

दिनांक ६ जून रोजी शिवराज्याभिषेक दिन व काल झालेला जागतिक पर्यावरण दिन या दोन्हींचे औचित्य साधून अंथरवन पिंपरी येथे ठीक सकाळी नऊ वाजता शिवराज्याभिषेक ध्वजारोहण करून वंदन करण्यात आले. याच निमित्ताने ग्रामपंचायत व बीड शहर बचाव मंच यांच्या यांच्या संयुक्त सहयोगातून वृक्षावरोपणाचा कार्यक्रम राबविण्यात आला. बीड शहर बचाव मंचाच्या वतीने २०० झाडे देण्यात आलेली आहेत व येत्या काळामध्ये ग्रामपंचायत १००० झाडे लावण्याचा उपक्रम लवकरच पूर्ण करील असा निर्धार व्यक्त करण्यात आला.

नुकतेच लोकमत समूहाच्या वतीने अंथरवण पिंपरी ग्रामपंचायतीला सरपंच ऑफ इयर २०२५ हा पुरस्कार देण्यात आला आहे. गावच्या सरपंच सौ. शिवगंगा ताई भाऊराव प्रभाळे या दाम्पत्यांनी गावांमध्ये फार छान कौतुकास्पद विकास कामे राबवली आहेत व अक्षरशः गावाचा कायापालट केला आहे.



गावामध्ये सगळीकडे गल्लोगल्ली सिमेंट रस्ते व पेवर ब्लॉक रस्ते केले आहेत. गावामध्ये अनेक विकासाच्या योजना राबविण्यात येत आहेत. ग्रामस्थांच्या सर्व अडीअडचणींना प्रभाळे दांपत्य अहोरात्र उभे असते. गावामध्ये वृक्षारोपण करून गावाला हिरवे नंदनवन करण्याचीअग्रणी भूमिका या प्रभाळे यांनी घेतली आहे. आजच्या या वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाला वामा'' चित्रपटाचे प्रसिद्ध अभिनेते महेशकुमार वनवे यांची बीड शहर बचाव मंचाच्या वतीने प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी ग्लोबल वॉर्मिंग हे जगावर आलेले मोठे संकट आहे अशी चिंता व्यक्त केली. यातून वाचण्यासाठी व पुढच्या पिढीला दुष्काळासारख्या मोठ्या नैसर्गिक संकटांपासून वाचण्यासाठी गावोगाव वृक्षारोपन केले जावे हाच एक पर्याय शिल्लक आहे असे मत व्यक्त केले. या वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाला बीड शहर बचाव मंचाच्या व ग्रामपंचायत च्या वतीने नितीनजी जायभाये, सरपंच सौ शिवगंगा ताई व भाऊराव प्रभाळे, ह.भ.प. नवनाथ महाराज हरको बाबा संस्थान, अभिनेते डॉ. ॲड.महेशकुमार वनवे, वनवे काका, पंचायत समितीचे वि.अ. कल्याणराव शेळके साहेब, अशोक येडे, ग्रामसेवक सौ.ज्योतीताई लेकुरवाळे, सुधीर देशमुख,उपसरपंच अशोक शिंदे, सदस्य अशोक शिंदे, संतोष शिंदे, दिलीप शिंदे, संग्राम वाघमारे, खाजा शेख, अॅड.नितीनजी वाघमारे, रामधन जमाले, अॅड. प्रेरणाताई सूर्यवंशी,लताताई राऊत, बाजीराव ढाकणे, डॉ.संजय तांदळे, अशोकराव येडे, किशकिन्दाताई ताई पांचाळ, माऊली शिंदे व मोठ्या संख्येने ग्रामस्थ सहभागी झाले होते.

# गुरुकृपा फार्मसी'च्या विद्यार्थ्यांनी बनवले केमिस्ट्री मधील उपकरणांचे थ्री-डी मॉडेल

माजलगाव। प्रतिनिधी

येथील गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या बी.फार्मासी अभ्यासक्रमाच्या तिसऱ्या वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी मेडिसिनल केमिस्ट्री या विषयात कामगिरी करत कॉलेज पातळीवर वेगवेगळ्या प्रकारचे थ्री-डी मॉडेल तयार करून दाखवले आहेत. यामध्ये पहिले थ्री-डी मॉडेल रिफ्लेक्स कंडेन्सर असून हे मॉडेल तृप्ती जाधव व त्यांच्या ग्रुपने तयार केले.या असेमलीचा वापर करून नवीन औषधी तयार करू करता येऊ शकतात, दुसरे मॉडेल टायट्रेशंन असेमली हे असून निकिता गिलबिले व तिच्या ग्रुप ने बनवले आहे. याचा उपयोग एखाद्या औषधी मधील घटकाचं प्रमाण पाहण्या साठी करता येऊ शकतो. तसेच तिसरे मॉडेल फिल्ट्रेशन असेमली हे आहे व दिपाली गायकवाड याच्या ग्रूपने ते बनवले आहे व त्याचा वापर एखाद्या केमिकलची शुद्धता करण्यासाठी होतो. हे सर्व मॉडेल केमिस्ट्री डिपार्टमेंटचे विभाग प्रमुख गणेश वाघमारे सर यांच्या मार्गदर्शनाखाली २१ विद्यार्थ्यांनी सक्रिय सभाग घेऊन तयार केले आहेत त्यांच्या यशा बद्दल गुरुकृपा ग्रूप ऑफ इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष डॉ.यशवंत राजेभोसले,प्रचार्य अमित बिंदू आणि टीचिंग स्टाफ यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



# अंबाजोगाई नगर परिषदेने राबविला एक पेड माँ के नाम उपक्रम

## जागतिक पर्यावरण दिनी केले ४० रोपांचे वृक्षारोपण

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**अंबाजोगाई नगरपरिषदेने एक पेड माँ के नाम या उपक्रमातून जागतिक पर्यावरण दिनी सर्व्हे नंबर-१७ मध्ये विविध प्रजातींच्या ४० रोपांचे वृक्षारोपण केले. वर्षभर एक पेड माँ के नाम उपक्रम राबविण्यात येणार आहे. या माध्यमातून वृक्ष संवर्धनास चालना मिळणार असून व वृक्ष संगोपन ही करण्यात येणार आहे.**

येथील नगरपरिषद अंबाजोगाई (जि.बीड) यांच्या मार्फत गुरूवार, दिनांक ५ जुन २०२५ रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अमृत व दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नगरी उपजीविका अभियान (डीएवाय - एनयुएलएम) कृतीसंगम उपक्रमांतर्गत सर्वे नंबर-१७ या ठिकाणी एक पेड माँ के नाम हा उपक्रम राबविण्यात आला. या माध्यमातून वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी अंबाजोगाई नगरपरिषदचे, कार्यालयीन अधिक्षक शेख इफ्तेखार, सय्यद अन्वर, शहर अभियान व्यवस्थापक दिलीप तांबारे, शहर समन्वयक शेख समीरोद्दीन, नगररचनाकार ज्ञानेश्वर पोटे, शहर अभियंता किशोर मुंडे, धनंजय चव्हाण, लखन ओहाळ, स्वच्छता विभागाचे राजू जोगदंड व इतर कर्मचारी तसेच शहरस्तर संघाच्या अध्यक्षा श्रीमती रोहिणी कडेकर, सिआरपी निर्गुण हावळे, सीमा खतीब, मनीषा वाघमारे, तसेच आनंदी, आदिशक्ती, आईसाहेब, प्रगती इत्यादी स्वयंसहायता महिला बचत गटांतील सदस्यांनी उत्स्फूर्तपणे वृक्षारोपण केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी स्वच्छता विभागाचे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. शहरातील विविध प्रभागांमध्ये तसेच शाळा, महाविद्यालय, शासकीय कार्यालयातील परिसरामध्ये



वृक्षारोपण करण्याची परवानगी दिल्यास एक पेड माँ के नाम हा उपक्रम मोठ्या प्रमाणात राबविण्यात येणार आहे. सदरील वृक्षारोपण केलेल्या वृक्ष रोपांचे एक वर्ष कालावधीसाठी संगोपन करण्याची जबाबदारी देखील स्विकारणार आहेत. अंबाजोगाई नगरपरिषदेने एक पेड माँ के नाम या उपक्रमातून जागतिक पर्यावरण दिनी सर्व्हे नंबर-१७ मध्ये विविध प्रजातींच्या ४० रोपांचे वृक्षारोपण केले. लागवड केलेल्या पर्यावरणपूरक लिंब, आपटा, चिंच, पिंपळ, करंज, वड इत्यादींचा समावेश आहे. याबाबत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना शहर अभियान व्यवस्थापक दिलीप तांबारे यांनी सांगितले आहे की, अंबाजोगाई नगरपरिषदेने सन्माननीय मुख्याधिकारी प्रियंका टोंगे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली व सुचनेनुसार एक पेड माँ के नाम हे अभियान सुरू केले आहे, ज्याचा उद्देश पर्यावरण संवर्धनासाठी समाजात जागरूकता पसरवणे आणि मातांबद्दल आदर व्यक्त करणे आहे. या मोहिमेअंतर्गत, आईच्या नांवाने एक झाड लावले जाते, जे पर्यावरणाचे रक्षण करते आणि चिरस्थायी स्मृती निर्माण करते. या मोहिमेचा उद्देश : पर्यावरण संवर्धन व्हावे, झाडे लावून, पर्यावरणाचे रक्षण करणे आणि निरोगी भविष्य निर्माण करणे हे या अभियानाचे खरे उद्दिष्ट आहे. आईंचा आदर : आपल्या आईच्या नांवाने झाडे लावून, मानवी जीवनाचे पालनपोषण करणाऱ्या मातांबद्दल आदर व्यक्त केला जातो. या अभियानात समुदाय सहभाग महत्त्वाचा आहे. स्थानिक समुदाय आणि विविध भागधारकांना सहभागी करून मोठ्या प्रमाणात सहभाग वाढविणे हे या मोहिमेचे खरे उद्दिष्ट आहे. हे अभियान मातांचे योगदान आणि महत्त्व अधोरेखित करते. हे अभियान देशाच्या शाश्वत विकासाच्या शोधाशी सुसंगत आहे, जी पर्यावरण आणि सामाजिक विकासामध्ये संतुलन स्थापित करते. या अभियानाअंतर्गत विविध प्रकारची झाडे लावली जातात, ज्यामुळे हिरवळ वाढते. या अभियानाद्वारे, लोकांना पर्यावरण संरक्षणाबद्दल शिक्षित केले जाते आणि झाडे लावण्यास प्रोत्साहित केले जाते. सदरील अभियानाच्या यशस्वितेसाठी मुख्याधिकारी प्रियंका टोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई नगरपरिषदेचे सर्व अधिकारी, विभागप्रमुख, कर्मचारी वर्ग, स्वच्छता विभागाचे कामगार बंधू-भगिनी आणि शहरातील विविध महिला बचत गट यांनी पुढाकार घेतला आहे. अशी माहिती शहर अभियान व्यवस्थापक दिलीप तांबारे यांनी दिली आहे.



परळी बीड, महाराष्ट्र: परळी (वै).येथे सामाजिक वनीकरणाच्या प्रयत्नांचा भाग म्हणून वृक्षारोपण करण्यासाठी मंत्री माननीय पंकजाताई मुंडे यांनी परळी येथील आनंदवनाला भेट दिली.व येथे कार्यरत असलेले वनपरीक्षेत्र अधिकारी श्री हनुमंत जाधवर साहेब यांनी वनविभागात केलेल्या उत्तम कामगिरीबद्दल पर्यावरण मंत्री मा. ना. पंकजाताई मुंडे यांनी त्यांचे कौतुक करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या

# मोठेवाडीत छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील मोठेवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालयात शिवराज्याभिषेक सोहळ्या निमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ.सुभद्राबाई अंगद खेत्री ह्या होत्या. तर तुकाराम पास्टे,राजे भाऊ मुळे,चेअरमन संभाजी चव्हाण,मा. उपसरपंच विद्यासागर करपे, पत्रकार राजाभाऊ पास्टे, चेअरमन रंजीत जाधव,युवासेना उपजिल्हाप्रमुख राहुल सुरवसे,राष्ट्रवादी युवक तालुका अध्यक्ष डॉ.नितीन जाधव, अॅड.पांडुरंग गोंडे,राजेभाऊ तपसे, ग्रा.पं सदस्य शाम



गिरी, गणेश सर्जे, प्रकाश शेळके, गणेश पास्टे,आदित्य गोंडे, अंगणवाडीताई पंचफुला पास्टे यांच्यासह शिवभक्तांची मोठी उपस्थिती होती.

# शंभर चीरा ते पाटोदा बोगस कामाच्या विरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने एक दिवसीय धरणे आंदोलन

**पाटोदा । प्रतिनिधी**

**शासनाची महत्त्वकांक्षा असणारी योजना म्हणजेच पंतप्रधान ग्रामसडक योजना या योजनेचा मुख्य हेतू असा आहे की खेडेगावात दळणवळणाचे साधन पोहोचले पाहिजे. शंभर चिरा ते ग्रामीण रुग्णालय पाटोदा हा पाच किमी अंतर रस्ता पंतप्रधान ग्रामसडक योजनेमधून चालू आहे पण हा रस्ता निव्वळ बोगस केल आहे. कार्यकारी अभियंता महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था बीड यांच्या निगरानेखाली या रोडचे काम चालू आहे पण संबंधित यंत्रणेने या कामात भ्रष्टाचार करून निवळ बोगस काम केले आहे.**

हा रस्ता अंदाजे पाच किलोमीटरचा आहे. या अगोदरही या रस्त्यावर दोन ते तीन वेळेस बजेट उचलून प्रशासनाचे दिशाभूल करण्यात आली आहे. वंचित बहुजन आघाडीच्या वतीने माननीय तहसीलदार साहेब यांना दिनांक ५/६/ २०२५रोजी निवेदन देऊन संबंधित संबंधित यंत्रणेचे शासकीय अधिकारी संबंधित गुत्तेदार यांच्यावर कारवाई करावा अशा आशयाचे निवेदन दिले आहे. गुरुवार पर्यंत संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना नोटीस दिली नाही व गुत्तदारावर कारवाई केली नाही तर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने पाटोदा तहसील समोर एक दिवशी धरणे आंदोलन १२ जून २०२५ रोजी करण्यात येणार आहे

# महायुती सरकारच्या फसव्या घोषणेच्या विरोधात शिवसेनेचे ‘क्या हुवा तेरा वादा’ आंदोलन -गिराम

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात सत्ता मिळवण्यासाठी महायुती सरकारने निवडणूक प्रचारात अनेक फसव्या घोषणांचा पाऊस पाडला होता, पण सत्ता मिळताच या घोषणांकडे जाणीव पुर्वक दुर्लक्ष केले.



महायुती सरकारच्या या फसवेगिरीचा जाब विचारण्यासाठी शिवसेनेचे ५ जून ते १२ जून पर्यंत “ क्या हुवा तेरा वादा “ असा प्रश्न करून गेंड्याची कातडी पांघरलेल्या महायुती सरकार ला जाब विचारणार असल्याचे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी म्हटले आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात महायुती सरकारने शेतकऱ्यांना कर्जमुक्त करून शेतकरी सन्मान योजनेतून १५ हजार रुपये देऊ, लाडक्या बहिणींना १५०० रुपयात वाढ करून २१०० रुपये देऊ, शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या खतांवरील अनुदानाच्या स्वरूपात परत करू, वृध्द पेन्शन धारकांना २१०० रुपये देऊ, शेतीला २४ तास वीज पुरवठा करू, शेती मालाला परवडेल असा हमीभाव देऊ, बी बियाणे आणि खताचे भाव कमी करू, अशा प्रकारच्या अनेक फसव्या घोषणा करून महायुती ने शेतकऱ्यांची मते लाटली, सत्ता मिळताच सोयीस्कर पणे या घोषणांकडे दुर्लक्ष केले,

सत्ताधारी तिन्ही पक्षांनी शेतकऱ्यांना तात्काळ कर्ज माफी देण्याची घोषणा केली होती कर्ज माफीच्या अपेक्षेत असणाऱ्या शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली, या उलट शेतकऱ्यांनी ३१ मार्च पर्यंत थकबाकी भरावी असा फतवा ◀◀ पान ३ वर

# अंबाजोगाईत महेश नवमी उत्साहात साजरी

## आधुनिक जीवनशैलीतही आपली संस्कृती टिकवून ठेवणे गरजेचे : अॅड. कविता मानधने

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथे दि. ४ जुन रोजी माहेश्वरी समाजाच्या वतीने माहेश्वरी समाजाचा उत्पत्ती दिन महेश नवमी उत्साहात साजरी करण्यात आली. महारुद्राभिषेक, रक्तदान शिबीर, शोभायात्रा, महेश पुजन, व्याख्यान यासारखे विविध उपक्रम दिवसभर राबवण्यात आले. यावेळी माहेश्वरी समाज हा संस्कृतीमुळे ओळखला जातो, बदलत्या आधुनिक जीवनशैलीत सुद्धा समाजाने आपली संस्कृती टिकवून ठेवणे गरजेचे असल्याचे प्रतीपादन गिता परीवाराच्या अॅड. कविता मानधने यांनी केले.

याबाबत सविस्तर असे की, माहेश्वरी समाजाचा उत्पत्ती दिन महेश नवमी निमित्त माहेश्वरी समाजाच्या वतीने येथील केदारेश्वर मंदिरात समाजाच्या वतीने महारुद्राभिषेक करण्यात आला. त्यानंतर येथील राजस्थानी मंगल कार्यालयात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यामधे ४३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. भगवान महेशची शहरातुन भव्य शोभायात्रा काढण्यात आली. यात महिला, युवक व पुरुषांनी मोठ्या संख्येनी सहभाग नोंदवला. येथील विलासराव देशमुख सभागृहात गिता परीवाराच्या अॅड. कविता मानधने ◀◀ पान ३ वर



# शुभांगी शिंदे आत्महत्या प्रकरणात भाजप पदाधिकाऱ्याचे नाव समोर

## चार आरोपी अटकेत, पाचवा फरार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील गीत्ता येथील शुभांगी संतोष शिंदे हिच्या आत्महत्या प्रकरणात मोठा खुलासा झाला आहे. या प्रकरणातील पाचवा आरोपी संदीप काचगुंडे हा भाजपचा धारूर तालुकाध्यक्ष असल्याचे समोर आले आहे. सद्यस्थितीत तो फरार असून, बर्दापूर पोलिस त्याचा शोध घेत आहेत.



शुभांगी शिंदे हिने सासरच्या मंडळींच्या सातत्यपूर्ण छळाला कंटाळून राहत्या घरात गळफास लावून आत्महत्या केली होती. शुभांगीच्या भावाने दिलेल्या फिर्यादीवरून पती संतोष शिंदे, सासरे विलास शिंदे, सासू सुमन शिंदे, नणंद सीमा शिंदे आणि पतीचा मित्र संदीप काचगुंडे यांच्या विरोधात बर्दापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर पतीसह सासू, सासरे आणि नणंद या चौघांना पोलिसांनी अटक केली असून, शुक्रवारी दुपारी ◀◀ पान ३ वर

# बनावट पीटीआर द्वारे जागा विकणाऱ्या वर गुन्हा दाखल करा- राजेश साळवे

माजलगाव (प्रतिनिधी)

शहरातील नगरपालिका हद्दीतील सर्वे नंबर पाच मधील मूळ मालक असलेल्या चौकीदार यांच्या जागेचे बनावट कागदपत्रे करून मनावर पी टी आर काढणाऱ्या व त्याद्वारे प्लॉटची विक्री करणाऱ्या वर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्याची मागणी नगरपरिषदेचे माजी बांधकाम सभापती राजेश साळवे यांनी मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली.



माजलगाव शहरात बोगस गुंठेवारी सह बोगस पीटीआर द्वारे नागरिकांची फसवणूक होत असल्याचे प्रकार उघड होत असतानाच माजलगाव शहरातील सर्वे नंबर पाच मधील काही प्लॉट स्वतःच्या मालकीचे असल्याचे दाखवून अशोक नगर भागातील शेख आफ्रिनबी मुन्ना,व शेख समीर हैदर यांना खरेदी खत क्रमांक २९५३ व ४६३८ ने दि.२७/७/२०२४व दि.२२/८/२४ रोजी ◀◀ पान ३ वर



बीड : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मौजे आंतरवनपिंप्री कार्यालय ता. जि. बीड यांच्यावती आंतरवनपिंप्री परिसरात दिनांक ६ जून २०२५ रोजी २०० वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी सरपंच प्रभाळे ताई, भाऊसाहेब प्रभाळे, डॉ संजय तांदळे, अशोक येडे,नितीन वाघमारे, नितीन जायभाये, बाजीराव ढाकणे, रामधन जमाले, अॅड. शैलेंद्रा डोईफोडे, किष्किंधा पांचाळ, लता राऊत, पंडित वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते.

## अनिलदादा जगताप यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यादिनी बीडवासियांकडून प्रेम -शुभेच्छांचा वर्षाव!

# लाडक्या बहिणींकडून पंचावन्न दिव्यांनी औक्षण; कलाकारांनी रांगोळीतून साकारले अनिलदादांचे प्रतिबिंब

बीड । प्रतिनिधी

शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यादिनी जिल्हाभरातून राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, पत्रकारिता अशा विविध क्षेत्रातील मंडळींनी एकत्रित येऊन अनिलदादा जगताप यांचा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा जल्लोषात साजरा केला. अनिलदादा जगताप यांनी सर्व शिवसैनिकांना बॅनरबाजी



नको, गरजवंतांना मदतीचा हात द्या असे अहवान केले होते. काल दि. ४ जून रोजी अनिलदादांच्या अहवानाला प्रतिसाद देत शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना, कामगार सेना ओबीसी व्हिजेएनटीसेना तथा अंगीकृत संघटनांचे सर्व आजी-



माजी पदाधिकारी लोकप्रतिनिधी यांनी मिळून विविध ठिकाणी वृक्षारोपण, अन्नदान, अनाथ आश्रमात किराणा वाटप, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, रेनकोट वाटप, गोरगरीब महिलांना साड्या वाटप तसेच रक्तदान शिबीर अशी ◀◀ पान ३ वर

### लाडक्या बहिणींनी पंचवन्न दिव्यांनी केले अनिलदादांचे औक्षण

अनिलदादा जगताप यांच्या निवासस्थानी असंख्य महिला-भगिनींनी एकत्रित येऊन पंचवन्न दिव्यांनी अनिलदादांचे औक्षण केले. विविध ठिकाणी सामाजिक उपक्रमांनी अनिलदादा यांचा वाढदिवस साजरा होत असताना महिला-भगिनींनी अनिलदादांचे पंचवन्न दिव्यांनी केलेले औक्षण अभिष्टचिंतन सोहळ्यातील एक भावनिक क्षण ठरला.

### बीड कलाकारांच्या अद्भुत कलाकृतीतून अनिलदादांचे अनोखे अभिष्टचिंतन!

बीडमधील कलाकारांनी एकत्रित येऊन रांगोळीच्या विविध रंगातून अनिलदादा जगताप यांची हुबेहूब प्रतिमा साकारत अनिलदादांचं अनोखे अभिष्टचिंतन केले. अनिलदादांच्या वाढदिवसाच्या दिनी बीडमधील सुप्रसिद्ध रांगोळीकार अंजलीताई खोबरे यांनी अनिलदादा जगताप यांची साकारलेली रांगोळी वाढदिवसाचे मुख्य आकर्षण ठरले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...


पुणे विशेष

शनिवार, दि.७ जुन २०२५ । पान ७

# सिंधुताई सपकाळांच्या आश्रमात लग्नासाठी मुली असल्याचं सांगत फसवणूक, फोन पेवरून १५ हजार घेतले, सासवड पोलिसांकडे लेखी तक्रार

**पुणे । प्रतिनिधी**

प्रसिद्ध समाजसेविका दिवंगत सिंधुताई सपकाळ यांच्या आश्रमात लग्नासाठी मुली आहेत, असं म्हणत अनेकांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे.फोन करून या सगळ्या संदर्भातली माहिती दिली जाते आणि नंतर रजिस्ट्रेशन म्हणून १५००० रुपये फोन पे ने किंवा 'गुगल पे ' ने मागवले जातात. हा सगळा प्रकार काही जणांनी सिंधुताई सपकाळ यांची मुलगी ममता सपकाळ यांच्यापर्यंत पोहोचवलाय. यानंतर ममता सपकाळ यांनीही आम्हाला लग्नासाठी मुलगी हवी आहे तुमच्याकडे मुलगी आहे का ? अशा आशयाने फोन करत सगळ्या प्रकारची शहानिशा केल्यानंतर हा सगळा प्रकार समोर आला .त्यानंतर त्यांनी सासवड पोलिसांकडे लेखी तक्रार दिली असून लवकरच पुण्यातील सायबर पोलीस स्टेशनमध्ये ही तक्रार देणार असल्याचं सांगितलंय .






नेमकं प्रकरण काय?

ममता सपकाळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, अलीकडच्या काळात काही व्यक्ती फोन करून 'सिंधुताई सपकाळ यांच्या आश्रमातील मुलींसाठी लग्नाची व्यवस्था करतोय' असे सांगत होते. त्यानंतर इच्छुकांकडून रजिस्ट्रेशन फीच्या नावाखाली १५,००० रुपये फोन पे किंवा गुगल पेद्वारे मागवले जात होते. काहींनी अशा प्रकारे पैसे देखील भरले आहेत. या प्रकाराची माहिती काही जागरूक नागरिकांनी ममता सपकाळ यांच्यापर्यंत पोहोचवली. त्यानंतर त्यांनी स्वतः फोन करून चौकशी करण्याचा निर्णय घेतला. आम्हाला लग्नासाठी मुलगी हवी आहे, तुमच्याकडे आहे का? अशा आशयाने विचारणा करत त्यांनी संबंधित व्यक्तीशी संवाद साधला. त्यावेळी देखील त्यांच्याकडून १५,००० रुपये मागण्यात आले, तसेच संपूर्ण वैयक्तिक माहिती देखील विचारण्यात आली. या फसवणुकीसंबंधी ममता सपकाळ यांनी सासवड पोलिसांना तक्रारपत्र दिलं असून, या प्रकारांची सखोल चौकशी व्हावी आणि माईंच्या नावाचा गैरवापर करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. यासोबतच, ममता सपकाळ यांनी काही स्क्रिनशॉट्स आणि कॉल रेकॉर्डिंगचे पुरावेही पोलिसांना सादर केले आहेत. सिंधुताई सपकाळ माईंच्या नावाचा गैरवापर करून जर कोणी फसवणूक करत असेल, तर ती बदनामी आम्ही खपवून घेणार नाही, असा इशाराही ममता सपकाळ यांनी दिलाय.

# राजगड फिरायला आलेल्या महिलेचा दुर्दैवी मृत्यू; पाय घसरला अन् थेट १५० फूट दरीत कोसळली

**पुणे । प्रतिनिधी**


पावसाळी वातावरण निर्माण झाल्यामुळे अनेकांनी गड किल्ले फिरण्यास सुरुवात केली आहे. मात्र पुण्यातील राजगडावर एक दुर्दैवी घटना घडली आहे. पुण्यातील वेल्हे येथील राजगडावर फिरायला आलेल्या महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. पर्यटनासाठी पतीसह आलेल्या या विवाहित महिलेचा १५० फूट खोल दरीमध्ये पडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

ही घटना राजगडावर काल गुरुवारी (दि.०५) घडली आहे. कोमल सतीश शिंदे (वय वर्षे २०) राहणार आळंदी, ता. खेड पुणे असे मृत महिलेचे नाव आहे, याचाबत अधिक माहिती देताना पोलिस म्हणाले, कोमल ही पतीसह राजगडावर पर्यटनासाठी आली होती. सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास बालेकिल्ला पाहून झाला होता. त्यानंतर बालेकिल्ल्यावरुन उतरताना ती कोसळल्याची प्राथमिक माहिती मिळाली होती.

यानंतर मृतदेह गडावरून खाली आणण्यासाठी पोलीस जवान युवराज सोमवंशी यांच्यासह आपत्ती व्यवस्थापन टीमचे सदस्य तानाजी भोसले, गणेश सपकाळ, संजय चोरघे, निलेश जाधव, संदीप सोळसकर, सनी माने, यांनी गडावर धाव घेत स्ट्रेचरच्या साह्याने मृतदेह गडावरून खाली आणला. दुपारी पाऊस पडल्याने गडावरील वाट निसरडी झाली होती. यामुळे मृतदेह खाली आणण्यास मोठा अडथळा निर्माण झाला होता.

उपचारापूर्वी मृत घोषित

दरम्यान रात्री साडेअकराच्या सुमारास वेल्हे



येथील ग्रामीण रुग्णालयाचे डॉक्टर शिवाजी कुरणकर यांनी कोमल हिचा उपचारा पूर्वी मृत्यू झाल्याची माहिती दिली. रात्री उशिरा वेल्हे ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. शिवाजी कुरणकर यांनी महिलेचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे घोषित केले असल्याची माहिती वेल्हे पोलिसांनी दिली असून, याबाबत अधिक तपास वेल्हे पोलिस करत आहेत.

# पुण्यात पुन्हा मुळशी पॅटर्न; जमिनीच्या वादातून वकिलाने बंदूक दाखवली; व्हिडीओ व्हायरल

**पुणे । प्रतिनिधी**

शिक्षणाची पंढरी म्हणून नावलौकिक असलेल्या पुणे शहराची औद्योगिक नगरी अशीही ओळख बनली असून येथील जमिनीचे भाव गगनाला भिडले आहेत. त्यामुळे, बिल्डर लॉबी, गुंठा मंत्री आणि रिअल इस्टेटमुळे पुणे जिल्ह्यात गुंडगिरी व गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचं पाहायला मिळत आहे. येथील या व्यवसायामुळे आर्थिक व्यवहारातून टोळ्या निर्माण होतानाचे चित्र देखील यापूर्वी दिसून आले आहे. मुळशी पॅटर्न हा चित्रपट देखील पुणे जिल्ह्यातील वाढते औद्योगिकरण आणि जमिनीच्या (डरपव) खरेदी-विक्री व्यवहारातून वाढलेल्या गुंडगिरीवरच आधारित आहे. आता, पुन्हा एकदा जमिनीच्या वादातून एका वकिलाने बंदूक बाहेर काढल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. वादातील जमिन पाहण्यासाठी आलेल्या वकिलाची जमिन मालकाने अडवणूक केल्यानंतर संबंधित वकिलाने चक्क बंदुकीचा धाक दाखवल्याचं पाहायला मिळत आहे.



वादातील जमीन पाहण्यासाठी गेलेल्या वकिलाने थेट बंदूक बाहेर काढल्याचा धक्कादायक प्रकार हिंजवडी लगतच्या कासारसाई इथं घडला. या घटनेचा व्हिडीओ सुद्धा समोर आला असून सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. बंदूक दाखवणाऱ्या वकिलांचे नाव संदीप भोईर असं आहे, ते धनंजय वाडकर यांचे वकील आहेत. कासारसाई येथील शब्बीर मुलानी आणि वाडकर यांच्यात जमिनीवरून गेल्या अनेक वर्षांपासून वाद सुरु आहे. मुलानी यांची काही जमीन वाडकरांनी खरेदी केली. मात्र, ही जमीन कूळ कायद्यात मोडत असल्यानं यासाठी गेली १० ते १२ वर्षांपासून न्यायालयीन लढा सुरू आहे. त्यातच, आज दुपारी दोनच्या सुमारास वकील संदीप भोईर हे कासारसाईत गेले, तेंव्हा त्या वादातील जमिनीच्या ठिकाणी निघाले असता मुलानी कुटुंबात अन् त्यांच्यात वाद झाले. त्यावेळी, वकील महोदयांसह आलेले काहीजण पळताना व्हिडिओत दिसून येत आहे.

मुलानी कुटुंबातील सदस्याने वकील महोदयांना अडवण्याचा प्रयत्न केला. या वादात वकील भोईरने कंबरेला अडकवले बंदूक बाहेर काढले, तेंव्हा मुलानी कुटुंब आक्रमक झाल्याचं दिसून आलं. हे पाहून वकील आणि त्यांच्या साथीदाराने तिथून पळ काढला. आता, दोन्ही बाजूच्या मंडळींना हिंजवडी पोलीस स्टेशनला बोलवण्यात आलं असून, पोलिसांकडून चौकशी करुन पुढची कारवाई केली जाणार असल्याची माहिती आहे. मात्र, या घटनेनं पुन्हा एकदा पुणे, पिंपरी चिंचवडमधील वाढती गुन्हेगारी, जमिनीच्या वादातून होणारे वाद ही गंभीर समस्या असल्याचं स्पष्ट झालंय.

# निलेश चव्हाणच्या शस्त्र परवान्याची चौकशी; पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली तपास

**पुणे । प्रतिनिधी**

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणातील आरोपी निलेश चव्हाणला शस्त्र परवाना कसा मिळाला, याची चौकशी करण्यासाठी गुरुवारी पोलीस आयुक्तालयात एक समिती नेमण्यात आली आहे. ही समिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करणार आहे.

चव्हाणला २०२२ मध्ये शस्त्र परवाना देण्यात आला होता. पुणे पोलिसांनी त्याचा शस्त्रपरवाना नाकारल्यानंतर मंत्रालयातून तो मिळवून देण्यासाठी कोणी मदत केली, हा प्रश्न त्यामुळे उपस्थित होत आहे. पोलिसांनी शस्त्र परवाना नाकारल्यानंतर त्या व्यक्तीला मंत्रालयात अपील करण्याची मुभा असते. मंत्रालयात उपसचिव किंवा गृहराज्यमंत्री यांच्या पातळीवर सुनावणी होऊन त्याबाबत निर्णय घेतला जातो.



परवाना मिळण्यासाठी चव्हाणने मंत्रालयात अपिल केले होते, तेव्हा वारजे पोलीस ठाण्यात त्याच्यावर एक गंभीर गुन्हा दाखल झाला होता. त्याच्या पत्नीनेच त्याच्याविरुद्ध तक्रार दाखल केली होती. गृहमंत्रालयाकडून अर्जाच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलीस आयुक्तालयातून चव्हाणसंदर्भात माहिती मागवली होती. यामध्ये त्याच्यावर काही गुन्हे दाखल आहेत का? याची विचारणा केली होती.

मात्र, त्याच्यावर गंभीर गुन्हा दाखल असूनही त्यासंदर्भात कोणतीच माहिती गृहमंत्रालयाला देण्यात आली नाही. चव्हाण हा वारजे पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहात असल्याने आयुक्तालयातून वारजे पोलिसांकडून माहिती मागवली होती. मात्र, त्यांनी गुन्हा दाखल असूनही आयुक्तालयाला त्याची कल्पना दिली नाही. त्यामुळे पोलीस आयुक्तालय आणि वारजे पोलीस ठाणे अशा दोघांकडूनही त्याच्यावर दाखल असलेला गुन्हा लपविण्यात आला. त्याला परवाना मिळाला, तेव्हा गृहराज्यमंत्री सतेज पाटील होते

# कन्नड शिवचरित्रामुळे राष्ट्रीय विचारांचा प्रसारः माजी मंत्री पी.जी.आर. शिंदिया

**खडकवासला । प्रतिनिधी**


कन्नड भाषेतील पहिल्या समग्र छत्रपती शिवाजी महाराज जीवनचरित्र पुस्तकामुळे शिवरायांच्या राष्ट्रीय विचारांचा कर्नाटकात तळागाळापर्यंत प्रसार होईल, असे प्रतिपादन कर्नाटकचे माजी मंत्री व कर्नाटक राज्य भारत स्काऊट गाइडचे प्रमुख पी.जी.आर. शिंदिया यांनी केले. पुण्यातील मावळा जवान संस्था आणि कर्नाटक मराठा वेल्फेअर असोसिएशनतर्फे बंगळुरू येथे आयोजित ३५२ व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यात ते बोलत होते.

बंगळुरू प्रेस क्लबच्या सभागृहात हा सोहळा संपन्न झाला. यावेळी इतिहास अभ्यासक दत्ताजी नलावडे लिखित आणि प्रा. शिवाजीराव चौहान यांनी कन्नड भाषेत अनुवादित 'विश्व के महानायक छत्रपती शिवाजी महाराज' या पुस्तकाचे प्रकाशन अभिनेते रजनीकांत यांचे बंधू सत्यनारायण राव गायकवाड यांच्या हस्ते झाले. सोहळ्याला विजयनगर साम्राज्याचे राजा कृष्णदेवराय वंशज, अभिनेते गणेशराव केसरकर, तेजस्वी पटेल, मराठा असोसिएशनचे अध्यक्ष मनोजकुमार रणोरे, सचिन पायगुडे, बाजीराव पारगे, सागर शहाडे उपस्थित होते.



शिंदिया म्हणाले, शिवाजी महाराज हे अखंड मानव कल्याणाचे जनक आणि विश्वाचे महानायक आहेत. त्यांचे जीवनचरित्र राष्ट्रीय भक्तीची ज्वलंत मशाल आहे. लेखक दत्ताजी नलावडे यांनी सांगितले की, शहाजीराजे आणि जिजामातांनी बंगळुरूच्या पवित्र भूमीत शिवरायांना स्वतंत्र राष्ट्राची शिकवण दिली. शिवरायांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून कर्नाटकासह सिलोनपर्यंत स्वराज्याचा विस्तार केला. त्यांची लढाई राजकीय होती, कोणत्याही धर्माविरुद्ध नव्हती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आण्णाजी आणि रोहित नलावडे यांनी केले.

## सकल हिंदू समाज सिंहगड रोड यांच्यावतीने व्याख्यानाचे आयोजन; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**पुणे । प्रतिनिधी**

सकल हिंदू समाज सिंहगड रोड यांच्या वतीने स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, महाराणा प्रताप, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून ह भ प. दत्तात्रय धुमाळ महाराज यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. नवीन दत्त मंदिर मधुबन सोसायटी प्रवेशद्वारसमोर व्याख्यानाचा कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमाला विश्व हिंदू परिषदेच्या मातृशक्ती प्रांत संयोजिका प्रिया रसाळ दत्ता भाऊ कोल्हे, सुरेश जोशी, प्रदीप कुलकर्णी आणि कोल्हेवाडी परिसरातील नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमाला कोल्हेवाडी परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमाला सुनील शिंदे विश्व हिंदू परिषदेचे सिंहगडभाग नांदेड प्रखंड सहमंत्री, आदित्य काळे विश्व हिंदू परिषद सिंहगड भाग नांदेड प्रखंड, कार्यकर्ता प्रीतम देशमुख यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खूप परिश्रम घेतले. तसेच या कार्यक्रमास नवीन दत्त मंदिर व्यवस्थापन समितीचे खूप मोलाचे सहकार्य लाभले.

# पुण्यातील कोट्यवधींच्या फ्लॅटशी शशिकांत चव्हाणांचा संबंध? सुषमा अंधारेंनी सगळचं काढलं, म्हणाल्या त्यांनी अनेकांना त्रास...

**पुणे । प्रतिनिधी**


वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात दररोज धक्कादायक माहिती समोर येत आहे. या प्रकरणात वैष्णवीचा सासरा आणि दीर यांना यांना थार गाडी देण्याचा आरोप चोंधे बंधूंवर करण्यात आला आहे. यानंतर चोंधे बंधूंचे कारनामे समोर आले.

संकेत चोंधे यांच्या पत्नी धनश्री चोंधे यांनी पती आणि दीराविरुद्ध खडक पोलीस ठाण्यात छळाची तक्रार दाखल केली होती. मात्र, तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चव्हाण यांनी दुर्लक्ष केल्याचा आरोप धनश्री यांनी केला होता. आता या प्रकरणात उबाठा गटाच्या उपनेत्या सुषमा अंधाळे यांनी शशिकांत चव्हाण यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.

कारवाई टाळण्यासाठी

शशिकांत चव्हाण यांची सख्खी बहीण ही जालिंदर सुपेकर यांची पत्नी आहे. शशिकांत चव्हाण यांच्यावरही कलम ३०७ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे. चव्हाण सध्या जामिनावर बाहेर असून, त्यांना पदोन्नती मिळाल्याचेही अंधारे यांनी सांगितले. चव्हाण यांनी अनेकांना त्रास दिला असून, मोक्का कारवाई टाळण्यासाठी १० लाख रुपयांची मागणी केली होती, असा सनसनाटी आरोप त्यांनी केला आहे. या विषयी त्यांनी पत्रकार परिषद घेत भाष्य केले.

अंधारे यांनी चव्हाण यांच्या उत्पन्नाचा स्रोत आणि त्यांनी जमवलेली प्रचंड मालमत्ता यांचा तपास व्हावा, अशी मागणी गृहमंत्र्यांना केली आहे. तसेच वैष्णवी हगवणे प्रकरणाशी चव्हाण



यांच्यावरील सीडीआर (उऊठ) आरोपांचा संबंध आहे का, याचीही चौकशी व्हावी, अशी देखील मागणी त्यांनी केली आहे. रावेतमधील 'एलिगन्स' नावाच्या स्कीममध्ये कोट्यवधींचे फ्लॅट असल्याची माहितीही समोर आली आहे. अनेक तालुक्यात शशिकांत चव्हाण यांच्या मालमत्ता आहेत, असे देखील त्या म्हणाल्या आहेत.

# तोंडावर स्कार्फ बांधून लिफ्टमध्ये शिरली, हिंजवडीतील अभियंता तरुणीचा उडी मारण्यापूर्वीचा व्हिडीओ समोर

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील हिंजवडी परिसरामधील एका २६ वर्षीय आयटी अभियंता तरुणीने 'सॉरी मला माफ करा, मी हे स्वच्छेने करत आहे, माझी आता जगायची इच्छा संपली आहे', अशी चिठ्ठी लिहून १३व्या मजल्यावरून उडी घेत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना ३१ मेच्या पहाटेच्या सुमारास घडली आहे. हिंजवडी येथील द क्राऊन ग्रीन सोसायटीच्या १३ व्या मजल्यावरून उडी घेत अभिलाषा भाऊसाहेब कोथंबिरे या २६ वर्षीय तरुणीने आपलं जीवन संपवलं आहे.

पोलिसांनी घटनेबाबत काय दिली माहिती?

हिंजवडी येथील द क्राऊन ग्रीन सोसायटीमध्ये ३१ मे रोजी अभिलाषा भाऊसाहेब कोथंबिरे नावाची आयटी अभियंता तरूणीने उडी मारून जीव दिला, तीचं वय २६ वर्षे इतकं होतं. या तरूणीने १३ व्या मजल्यावरून उडी मारून आपलं जीवन संपवल्याचं प्राथमिक तपासामध्ये समोर आलं आहे. या तरूणीने आत्महत्या करण्यापूर्वी सूसाईड नोट देखील लिहून ठेवली होती. त्या अनुषंगाने तपास सुरू आहे. सूसाईड नोटमध्ये तीने आपल्या आई वडीलांची माफी मागितली आहे. तिच्या मैत्रिणींची देखील माफी मागितली आहे. आयुष्य जगून झालं आहे असं लिहून तिने आपलं जीवन संपवलं आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

आत्महत्येपूर्वीचा सीसीटीव्ही व्हिडीओ देखील समोर

अभिलाषाचा आत्महत्येपूर्वीचा व्हिडीओ देखील समोर आला आहे. चार वाजून ४२ मिनिटांनी ती लिफ्टमध्ये येते. त्यानंतर लिफ्टचं बटन दाबून ती अगदी शांतपणे लिफ्टला टेकून उभी राहिलेली दिसते, तिने स्कार्फ बांधलेला होता. त्यानंतर लिफ्ट तेराव्या मजल्यावर आल्यावर ती लिफ्टमधून बाहेर पडते, हा अभिलाषाचा आत्महत्येपूर्वीचा सीसीटीव्ही व्हिडिओ सध्या समोर आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अभिलाषा घटनेच्या दिवशी पहाटे ४.३० सुमारास दुचाकीने सोसायटीच्या आवारात आली. लिफ्टने १३व्या मजल्यावरती गेली पहाटे ४.४२ सुमारास तिने आत्महत्या केल्याचं निदर्शनास आले आहे. अभिलाषाच्या शव विच्छेदन अहवालात तिच्या शरीरावरिल महत्वाच्या अवयवांना गंभीर इजा झाल्याचं सांगण्यात आलं आहे. या प्रकरणी हिंजवडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कन्हैया थोरात यांनी अभिलाषाच्या मृत्यूची आकस्मिक नोंद केली असून, या घटनेत कोणत्याही प्रकारचा घातपात अथवा संशयास्पद काही आढळून आले नसल्याचे म्हटले आहे . प्राथमिक दृष्ट्या तिने नैराश्यातून आत्महत्या केल्याचं त्यांनी दिसून येत आहे. तिच्या खोलीची झाडाझडती घेतली असता एक तिने लिहिलेले सुसाइट नोट सापडली आहे , त्यावर सॉरी मला माफ करा, मी हे स्वच्छेने करत आहे, माझी आता जगायची इच्छा संपली आहे असं लिहलेली सुसाइड नोट आढळून आली आहे. याबाबत अधिक तपास सुरू आहेत.

अभिलाषाच्या शव विच्छेदन अहवालात तिच्या शरीरावरील महत्वाच्या अवयवांना गंभीर इजा झाल्याचे म्हटले आहे. या प्रकरणी हिंजवडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कन्हैया थोरात यांनी अभिलाषाच्या मृत्यूची आकस्मिक नोंद केली असून, या घटनेत कोणत्याही प्रकारचा घातपात अथवा संशयास्पद काही संकेत आढळून आले नसल्याचे म्हटले आहे. प्राथमिक दृष्ट्या तिने नैराश्यातून आत्महत्या केल्याचं त्यांनी म्हटले आहे. तिच्या खोलीची झाडाझडती घेतली असता तिने लिहिलेले सुसाइट नोट सापडली आहे, त्यावर सॉरी मला माफ करा, मी हे स्वच्छेने करत आहे, माझी आता जगायची इच्छा संपली आहे, असं लिहिलेलं आढळून आले आहे. याबाबत अधिक तपास हिंजवडी पोलिस करत आहेत.

नॅपकीन, मोबाइल पोलिसांनी केले जप्त

अभिलाषा हिच्यासोबत राहत असलेल्या तिच्या मैत्रिणीशी पोलिसांनी संपर्क साधला असता तिने दिलेल्या माहितीनुसार, अभिलाषा रात्री एक वाजेपर्यंत रूममध्ये होती. त्यानंतर मी सकाळी पाच वाजता उठले असता ती रूममध्ये दिसली नाही. त्यावेळी बाथरूम भिंतीवर रक्ताचे पुसट डाग दिसले. परंतु, त्याबाबत लक्षात आले नाही. त्यानंतर मी पुन्हा सकाळी दहा वाजता उठले असता, अभिलाषा रूममध्ये आली नव्हती. त्यामुळे तिच्याशी संपर्क करत होते. परंतु, तिचा फोन बंद होता त्यामुळे संपर्क झाला नाही.

काही वेळाने पोलिसांकडून मला या घटनेबाबत समजले. त्यानंतर आम्ही पुन्हा रूमची पाहणी केली असता अभिलाषा हिच्या बेडवर नॅपकिन व इनरवर रक्ताचे डाग दिसून आले, असे अभिलाषाच्या मैत्रिणीने पोलिसांना सांगितले.

पोलिसांनी तिच्या रूमची केली पाहणी असता, अभिलाषा हिने लिहिलेली सुसाईड नोट पोलिसांना सापडली. 'माझी जगायची इच्छा संपली आहे. मी हे स्वतःच्या मर्जीने करत आहे.' असे चिठ्ठीमध्ये लिहिले आहे. रक्ताचे डाग असलेले नॅपकिन, इनर, उशीचे कव्हर व मोबाइल पोलिसांनी जप्त केले. तिने चिठ्ठीत लिहिलेल्या मजकुराप्रमाणे तिने नैराश्यातून आत्महत्या केली असल्याची शक्यता असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.